


नि:पक्ष व निर्भीडतेचा पुरस्कार करणारे एकमेव परिवर्तनवादी दैनिक

# महान कार्य




वर्ष १४ वे । अंक : २७५ । पाने : ६ । शुक्रवार दि. २१ जानेवारी, २०२२ । किंमत : २ रुपये

Kolhapur Volume :14 ♦ Issue : 275 ♦ Pages : 6 ♦ Date : Friday 21 January, 2022 ♦ Price 2 Rs. ♦ RNI No. MAHMAR/ 2005/20272 ♦ Post Reg. No. - KLR294/2022-2024 ♦ www.mahankarya.com

### ठरल्याप्रमाणं घडलं । जिल्हा बँक उपाध्यक्षपदी आम. राजूबाबा आवळे

## अध्यक्षपदी ना. हसन मुश्रीफ

**कोल्हापूर/महान कार्य वृत्तसेवा :**
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ तर उपाध्यक्षपदी आमदार राजूबाबा आवळे यांची बिनविरोध निवड झाली.

निवडीपूर्वी आम. विनय कोरे, आम. पी.एन. पाटील, पालकमंत्री सतेज उर्फ बंटी पाटील, मंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकर, माजी खास. श्रीमती





निवेदिता माने, रणवीर गायकवाड, श्रृतिका काटकर आदींच्यात बैठक पार पडली.

बैठकीनंतर अध्यक्षपदासाठी ना. मुश्रीफ आणि उपाध्यक्षपदासाठी आम. राजूबाबा आवळे यांचे नाव निश्चित झाल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, बैठक अर्ध्यावर सोडून आमदार डॉ. विनय कोरे (सावकार) बाहेर पडले. सगळे व्यवस्थित ठरले आहे.

## जयसिंगपूर, उदगाव, चिपरीत कोरोनाच्या रुग्णसंख्येत वाढ

**जयसिंगपूर/महान कार्य वृत्तसेवा :**
शिरोळच्या ग्रामीण भागात कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ होत चालली आहे. उदगाव, चिपरी, संभाजीपूर, चिंचवाड येथे कोरोनाचे रुग्ण आढळत आहेत.

वैद्यकीय अधिकारी डॉ. पांडुरंग खटावकर यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले, उदगाव येथे ४, चिपरी येथे ४, संभाजीपूर येथे ५, चिंचवाड येथे २ व अन्य परिसरात असे मिळून ३० कोरोनाचे पॉझिटीव्ह रुग्ण आढळले आहेत.

दरम्यान, जयसिंगपूर शहरातील गल्ली नं. ५ मध्ये १, गल्ली नं. १० मध्ये १, इंदिरा हौसिंग सोसायटीत ५, डवरी हौसिंग सोसायटीत १, सुदर्शन चौक १, अजिंक्यतारा सोसायटी १, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोसायटी १ असे शहरातही कोरोनाचे रुग्ण आढळले आहेत.

## लक्ष्मीवाडी उपसरपंचपदी सौ. अर्चना झलग

**लक्ष्मीवाडी/महान कार्य वृत्तसेवा :**
सौ. अर्चना कृष्णा झलग यांची गुरुवारी लक्ष्मीवाडी (ता. हातकणंगले) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली. अध्यक्षस्थानी सरपंच रामदास हांडे होते.

यावेळी किरण खोत, प्रभू झलग, सुरेश खोत, रेखा खोत, संपदा खोत, गितांजली हांडे, ग्रामसेवक वि.सी. चौगुले, सर्जेराव खोत, दिलीप झलग आदी उपस्थित होते.

निवडीनंतर सौ. अर्चना कृष्णा झलग बोलताना म्हणाल्या, सहकारी सदस्य, सदस्या आणि ग्रामस्थांना विश्वासात घेऊन लक्ष्मीवाडी गावच्या विकासाला आपले प्राधान्य असेल.

सौ. झलग यांच्या समर्थकांनी निवड होताच गुलालाची उधळण करत फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला. गावातील वेगवेगळ्या मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

## दोन साखर कारखान्यातील हवाई अंतराची अट काढून टाका

**साखराळे/महान कार्य वृत्तसेवा :**
दोन साखर कारखान्यातील हवाई अंतराची अट काढून टाका, जेणेकरुन साखर कारखान्यांची संख्या वाढेल, स्पर्धेत ऊस गाळपास जाण्यासाठी कारखानदार धडपडतील आणि ऊस उत्पादकांना चारपैसे अधिक मिळतील. यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा, अशी मागणी शेतकरी संघटनेचे नेते व ऊस आंदोलनाचे सरसेनापती रघुनाथदादा पाटील यांनी केली आहे.



पाटील बोलताना म्हणाले, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळासाठी प्रतिटन १० रु. ऊसाच्या बिलातून कपात करण्यास शासनाचा जो निर्णय आहे त्याला शेतकरी संघटनेचा विरोध आहे. वास्तविकरित्या राज्य सरकार अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, आण्णाभाऊ साठे महामंडळ, बार्टी व अन्य महामंडळे सरकारी मदतीवर जसे चालवते त्याचपध्दतीने गोपीनाथ मुंडे ऊसतोड महामंडळ चालविले पाहिजे. पंतप्रधान पिकविमा योजना अपयशी ठरली आहे. केवळ कंपन्यांना मलिदा मिळतो, सरकारने शेतकऱ्याच्या पिकविम्यासाठी कंपन्यांना पैसे देण्याऐवजी शेतकऱ्याला पैसे दिले पाहिजेत. शेतकऱ्याला केंद्र सरकार ६ हजार रुपये देत आहे, ही रक्कम तुटपुंजी आहे. सरकारने शेतकऱ्याला ६० हजार रु. प्रतिवर्षी मदत करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## ऊसाला आला तुरा, कारखान्यांनी लवकर नेलेला बरा

**हातकणंगले/महान कार्य वृत्तसेवा:**
हवामान आणि होत असलेला तोडणीला विलंब यामुळे ऊसाला तुरा आला आहे. याचा परिणाम ऊस पोकळ आणि भूस बनत चालला आहे. साखर कारखानदारांना हे चित्र दिसत नाही का? असा थेट सवाल शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

खराब वातावरणामुळे रब्बीची पिके गेली, पावसाने खरीपाची पिके गेली. नदीकाठची पिके महापुराने नेली. आजही पूरबुडीत ऊस तुटलेला नाही.

**पब्लिक डिमांड**
**विनयकुमार पाटील**

साखर कारखानदारांनी तोडणी आणि वाहतुकीचे नियोजन गेटकेनला अधिक दिल्याने हक्काचा ऊस तसाच राहिला आहे. तो तुटणार कधी? असे मत व्यक्त होत आहे. खासदार, आमदार, जि.प., पं.स. सदस्य होण्यासाठी चढाओढ सुरु आहे. पण, शेतकऱ्याचा प्रश्न सुटावा याकरीता नेत्यांनी केलेले दुर्लक्ष हा सध्या चर्चेचा विषय बनत चालला आहे. ऊसाला तुरा येत असल्याने ऊस वजनात मार खाणार अशी भिती व्यक्त होत आहे.

## बोरगाव येथे मटका सुरु

**बोरगाववाडी/महान कार्य वृत्तसेवा:**
बोरगाव येथे कुरुंदवाड, हेरवाड येथील खेळाडूंसाठी मटका सुरु झाला आहे. दरम्यान या विरुध्द कुणी आवाज उठवला तर सदलगा पोलिस ठाण्यात तक्रारधारकाच्या विरोधात खोटा गुन्हा दाखल होईल अशी लोकांत भिती आहे.

## सतीश शिंदे दुचाकी चोरी प्रकरणी ताब्यात

**चिपरी/महान कार्य वृत्तसेवा :**
सतीश आनंदा शिंदे (रा. चव्हाण मळा, संगमनगर, खोतवाडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) याला मोटरसायकल चोरीचा आरोप ठेवून ताब्यात घेतले आहे असे जयसिंगपूर पोलिसांनी गुरुवारी सांगितले.

पोलिस म्हणाले, अनिल कल्लाप्पा कोरे यांनी फिर्याद दिली होती. त्यानंतर वाहन चोरीचा तपास सुरु झाला होता. पोलीस निरीक्षक राजेंद्र मस्के यांनी पेट्रोलिंग करुन रेकॉर्डवरील सराईत मोटरसायकल चोर, गुन्हेगार व संशयीत इसम चेक करुन त्याच्याकडून तपास करुन मोटरसायकल गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना पो.कॉ. संदेश शेटे, पो.कॉ. रोहीत डावळे, वैभव सुर्यवंशी यांना दिल्या होत्या. पोलिसांना बातमी लागली, पार्वती इंडस्ट्रीजकडे जाणाऱ्या मार्गावर एकजण संशयीत फिरत आहे. त्याची चौकशी केली असता समाधानकारक माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे दिली त्यामुळे त्याला पोलिसांनी विश्वासात घेतले असता त्याने मोटरसायकल जयसिंगपूर येथील अक्कोळे हॉस्पिटलपासून दीड महिन्यापूर्वी चोरी केली असल्याचे सांगितले, असे पोलिस म्हणाले.

## हातपाटीने वाळू काढण्यास मिळणार परवानगी; पर्यावरणाचा घ्यावा लागणार रदाखला

**औरवाड/महान कार्य वृत्तसेवा:**
गुरुवारी मंत्रीमंडळात एक महत्वपूर्ण ठराव झाल्याची माहिती पुढे आली आहे. नदीपात्रातील वाळू हातपाटीने काढण्यास पर्यावरणाचा दाखला देऊन लवकरच सरकार मंजूरी देणार आहे. यासाठी हातची किंमत स्वामीधनाची रॉयल्टी शासन भरुन घेणार व वाळू उत्खननाचा कालावधी ५ वर्षापर्यंत वाढविण्यास आणि यशस्वी लिलावधारकास हेतूपत्र मिळाल्यानंतर पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेण्यास सूचना देण्याचे ठरल्याचे कळून आले आहे. दरम्यान, लवकरच याचा जी.आर. खाली येण्याची शक्यता आहे.

## श्रीमंत पाटील यांना मंत्री करा

**ममदापूर/महान कार्य वृत्तसेवा:**
आमदार श्रीमंत पाटील यांना भारतीय जनता पार्टीने कर्नाटकात कॅबिनेट मंत्री तात्काळ करावे अन्यथा मराठा समाज स्वस्थ बसणार नाही, असे बैठकीत ठरले आहे. दरम्यान, या प्रश्नी समाज एकसंघ होत चालला आहे.

## जयसिंगपूर नगरपालिका निवडणूक ताराराणी आघाडी, भाजपा एकत्र येण्याची शक्यता

**बावडा/महान कार्य वृत्तसेवा :**
विधानपरिषद निवडणुकीत जे माजी आमदार महादेवराव महाडिक यांचा आदेश डावलून अमल महाडिक यांच्या विरोधात सहलीला गेले अशांना वगळून ताराराणी आघाडी आणि जयसिंगपूर शहर भाजपा एकत्रित निवडणूक लढविण्यासाठीची एक बैठक गुरुवारी पार पडल्याचे वृत्त हाती आले आहे.

दरम्यान, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष माजी खासदार धनंजय महाडिक हे याबाबत अंतिम निर्णय घेणार आहेत. दरम्यान, ज्यांनी विधानपरिषद निवडणुकीत ताराराणी आघाडीत राहून काँग्रेसची सहल पत्करली अशांची संगत नको असे ठरल्याचे कळते.

### आजचा दिवस

राहुकाळ सकाळी १०.३० ते १२ पर्यंत. सकाळी ९ नंतर दिवस चांगला. काहीअंशी शारीरिक कष्ट सहन करावे लागतील. पैसा खर्च कराल, विम्याचे पैसे मिळविण्याच्या भानगडीत पडाल, नोकरी, व्यवसायात बदल करण्याची इच्छा होईल पण, सायंकाळनंतर ती मावळेल. सासूरवाडीकडून आर्थिक लाभाची शक्यता. जोडीदारात किरकोळ वाद होण्याची शक्यता. मेष, वृषभ, मिथून या राशींना दिवस अनुकूल राहील. वस्त्रात गुलाबी रंगछटा किंवा गुलाबी रंग उपयुक्त पडेल. १, ५, ७ या अंकांचा प्रभाव दिवसावर राहील. लाल मिरची, गहू, तांदूळ, क्रुड ऑईल तेजीत राहील. संकष्टी चतुर्थी असल्याने गणेशाची अराधना महत्वाची.

## कुरुंदवाडात कचरा उठाव मोहिमेला गती मिळावी

**कुरुंदवाड/महान कार्य वृत्तसेवा :**
कुरुंदवाड येथे पुन्हा कचरा ठिकठिकाणी साचत चालला आहे. कचरा उचलण्यासाठीची मोहिम तात्काळ गतिमान व्हावी अशी मागणी होत आहे. दरम्यान, या प्रश्नी काही संघटना आंदोलनाच्या तयारीत आहेत.

## गोकुळ, जिल्हा बँक स्विकृतसाठी हालचाली सुरु

**कोवाड/महान कार्य वृत्तसेवा :**
कोल्हापूर जिल्हा दूध संघ (गोकुळ) व कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या स्विकृत सदस्य पदासाठीच्या हालचाली गुरुवारी सायंकाळनंतर सुरु झाल्या आहेत.

विरेंद्र मंडलिक यांचे नाव गोकुळ दूध संघासाठी यापूर्वीच ठरले असल्याची चर्चा आहे. तर युवराज पाटील यांनाही जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीवेळी शब्द दिल्याची चर्चा होती. याशिवाय आरोग्य राज्यमंत्री डॉ. राजेंद्र पाटील-यड्रावकर यांचे समर्थक शिरोळचे नगराध्यक्ष अमरसिंह पाटील यांचेही नाव दूध संघासाठी चर्चेत होते.

कोल्हापूर जिल्हा बँकेच्या निवडणुकीत पराभूत झालेले आम. प्रकाश आवाडे, मदन कारंडे ही दोन नावेही सध्या बँकेसाठी स्विकृत संचालक पदासाठी चर्चेत आहेत. आम. विनय कोरे हे नाराज आहेत, त्यामुळे कदाचित आवाडे आणि पुनर्वसन म्हणून मदन कारंडे ही दोन नावे पुढे येण्याची शक्यता आहे. तथापी आता नेत्यांना संस्था मिळाल्या, आमदारकी मिळाली त्यामुळे या निवडी येत्या आठवड्यात किंवा १५ दिवसात होण्याची शक्यता आहे.

## कागल न.पा.साठी बैठका सुरु

**कागल/महान कार्य वृत्तसेवा :**
कागल नगरपालिका निवडणुकीसाठी आरक्षण आणि वार्ड प्रपोजल फायनल होण्यापूर्वीच इच्छुकांच्या बैठकांना वेग आला आहे. प्रभाग कसा होणार? आरक्षण कोणते असेल? याहीपेक्षा आपली पार्टी उभी करायची आणि पार्टीतून निवडणूक लढवायची, संधी मिळेल तो प्रभाग शोधायचा अशा हालचाली गुरुवारी गतिमान झाल्या होत्या. येथून जवळच असलेल्या एका हॉटेलवर इच्छुकांची बैठक गुरुवारी पार पडल्याचे वृत्त आहे.

## भारतीय जनता पार्टीत नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता

**यड्राव/महान कार्य वृत्तसेवा :**
भारतीय जनता पार्टी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत ताकदीने उतरण्याची तयारी करत आहे. ग्रामीणच्या प्रभारी ॲड. सौ. सोनाली मगदूम या नेटके नियोजन करणार असल्याचे समजून आले आहे. दरम्यान, येणाऱ्या निवडणुकीत वेगवेगळ्या मतदार संघात नव्या चेहऱ्यांना संधी द्यायची आणि कमळ लोकसभेपूर्वीच प्रत्येक मतदारांच्यापर्यंत पोहोचवायचे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विरोध करणाऱ्यांना तालुक्यात जमवून घ्यायचे नाही, असे भाजपातील एक मोठा गट ताकदीने काम करत असल्याचे कळते.

## अशोकराव माने यांना संधी द्या

**पुलाची शिरोली/महान कार्य वृत्तसेवा:**
दलितमित्र डॉ. अशोकराव माने यांना कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक मंडळात स्विकृत पदावर आम. विनय कोरे यांनी संधी द्यावी व हातकणंगले तालुक्यातील राजकीय पासंग समतोल ठेवावा, अशी मागणी होत आहे.

## मिरज-अर्जुनवाड मार्गावर रेल्वे उड्डाणपूल करा

**अर्जुनवाड/महान कार्य वृत्तसेवा :**
मिरज-अर्जुनवाड मार्गावर रेल्वे रुळावर मोठे उड्डाणपूल बांधण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

खासदार संजयकाका पाटील यांनी या प्रश्नात पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. खास. पाटील गटाचा कवठे महांकाळ नगरपंचायत निवडणुकीत सपाटून पराभव झाला आहे. त्यामुळे खास. पाटील कदाचित जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी किमान पुढाकार घेतील अशी अपेक्षा फुकट मत देणाऱ्या प्रवाशी मतदारांतून व्यक्त होत आहे.

दरम्यान, सातत्याने रेल्वे ये-जा करीत असल्याने गेट बंद होते आणि याचा परिणाम दवाखाना, शिक्षण, नोकरी आदी क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात होतो. यासाठी खास. पाटील यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे.




## कृषीमुल्य आयोगाचे अध्यक्षपद गणपतराव पाटील यांना द्यावे

**यड्राव/महान कार्य वृत्तसेवा :**
शिरोळ येथील श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष काँग्रेस पक्षातील जेष्ठ नेते गणपतराव पाटील यांना राज्य कृषीमुल्य आयोगाचे अध्यक्षपद काँग्रेस पक्षाने द्यावे, अशी मागणी होत आहे.

राज्यातील महामंडळाचे अध्यक्ष आणि काही महामंडळांचे संचालक ही पदे फेब्रुवारी महिन्यात दिली जाणार असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, शिरोळ येथील दत्त कारखान्याचे अध्यक्ष गणपतराव पाटील हे काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ आहेत. पक्षाने विधानसभेला जागा स्वाभिमानीसाठी सोडली त्यामुळे त्यांनी स्वाभिमानीचा निष्ठेने प्रचार केला होता.



तर स्वाभिमानीने ते कारखानदार असूनही जिल्हा बँक निवडणुकीत त्यागाने प्रचार केला होता. काँग्रेसच्या जिल्ह्याच्या नेत्यांनी परिपूर्ण विचार करुन तात्काळ गणपतराव पाटील यांना राज्य कृषीमुल्य आयोगाचे अध्यक्षपद द्यावे, अशी मागणी होत आहे.

## आम. राजेश पाटील यांना पश्चिम महाराष्ट्र देवस्थानचे अध्यक्षपद द्या

**चंदगड/महान कार्य वृत्तसेवा :**
आमदार राजेश पाटील यांना पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे अध्यक्षपद कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा देऊन तात्काळ देण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

कोल्हापूर जिल्हा दूध संघ, जिल्हा मध्यवर्ती बँक या दोन संस्थांच्या निवडणुकीत ते पक्षाशी एकनिष्ठ राहिले आहेत. शिवाय सिमाभागातील ते ताकदवान नेते आहेत. काठावरचे सरकार असूनही त्यांना मोठी संधी राज्य सरकारने दिली नाही. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे अध्यक्षपद विनाविलंब त्यांना द्यावे, अशी मागणी होत आहे.

# इचलकरंजीत एक लाख रूपये असलेली बॅग हातोहात लंपास

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

मोटरसायकलला अडकविलेली १ लाख रुपये असलेली बॅग चोरट्याने हातोहात लंपास केली. ही घटना शनिवारी दुपारच्या सुमारास तारा हॉटेलनजीक कॅनरा बँकेसमोर घडली. याबाबतची फिर्याद प्रकाश रायाप्पा सुतार (वय ६१ रा. यशोलक्ष्मीनगर) यांनी गावभाग पोलिसात दिली आहे.

याबाबत पोलिस व घटनास्थळावरुन मिळालेली माहिती अशी, यशोलक्ष्मीनगर येथे राहणारे प्रकाश सुतार हे दुपारच्या सुमारास कॅनरा बँकेत गेले होते. बँकेतून त्यांनी १ लाख रुपयांची रक्कम काढली. ती रक्कम ठेवलेली व चेकबुक असलेली बॅग सुतार यांनी आपल्या मोटरसायकलला अडकविली होती. या दरम्यान ते मित्रासमवेत बोलत थांबले होते. हीच संधी साधत चोरट्याने मोटरसायकलला अडकविलेली बॅग लंपास केली. काही वेळानंतर दुचाकीला बॅग नसल्याचे सुतार यांच्या लक्षात आले. त्यावेळी त्यांनी आरडाओरडा केला आणि शोधाशोधही केली. पण चोरटा मिळून आला नाही. याबाबती माहिती मिळताच गावभागचे पोलिस निरिक्षक राजू ताशिलदार हे घटनास्थळी आले. त्यांनी परिसरातील सीसीटिव्ही फुटेज तपासले. या प्रकरणी सुतार यांनी गावभाग पोलिसात फिर्याद दिली असून अधिक तपास सपोनि प्रमोद मगर हे करीत आहेत.

# यंत्रमाग कामगार कल्याणकारी मंडळाच्या घोषणेची अंमलबजावणी करावी

## कामगार संघटना कृती समितीची कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे मागणी

**इचलकरंजी/महानकार्य वृत्तसेवा**

सन २०१३ मध्ये झालेल्या करारानुसार यंत्रमाग कामगारांना मजूरीवाढ जाहीर करावी, मागील ५ वर्षांचा मजूरी फरक किंवा वाढलेला महागाई भत्ता मिळावा आणि यंत्रमाग कामगार कल्याणकारी मंडळाच्या घोषणेची अंमलबजावणी करावी आदी मागण्या येथील कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्यावतीने कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

इचलकरंजी आणि परिसरातील यंत्रमाग कामगारांनी किमान वेतनाच्या अंमलबजावणीसाठी सन २०१३ मध्ये ४९ दिवसाचा संप केला होता. त्यावेळी कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत किमान वेतनाला धरुन ५२ पीक प्रतिमीटर कापडाला २६ पैसे मजूरीवाढीचा निर्णय घेण्यात आला होता. त्याची २०१६ पर्यंत अंमलबजावणी झाली.

मात्र सन २०१७ पासून कारखानदारांनी या निर्णयाला केराची टोपली दाखवली आहे. वारंवार मजुरीवाढीची मागणी करूनही कामगार खाते मूग गिळून गप्प आहे.

कारखानदार कामगार कायद्याची अंमलबजावणी करत नाहीत आणि कामगार खाते कायदा मोडणाऱ्यांवर कारवाई करत नाही. परिणामी मालकांचा फायदा आणि कामगारांचे नुकसान होत आहे. सन २०१६ मध्ये महागाई भत्ता १६८२ होता तो आता २०२१ डिसेंबरला ४४६६ इतका झाला आहे. या हिशेबाप्रमाणे प्रत्येक कामगाराचे मागील ५ वर्षात प्रत्येक कामगाराचे दीड लाख रुपये कारखानदारांची दिले नाही.

मजुरीवाढीच्या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्याने मागील ५ वर्षात इचलकरंजी परिसरात ५० हजारहून अधिक यंत्रमाग कामगारांचे ७५० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याने यंत्रमाग कामगारांच्यात तीव्र असंतोष पसरला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही कामगार विभाग मजुरीवाढ जाहीर करत नसल्याने कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या शिष्टमंडळाने कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन दिले.

शिष्टमंडळात शामराव कुलकर्णी, धोंडीबा कुंभार, भरमा कांबळे, शिवानंद पाटील, पिंटु गळतगे यांच्यासह कामगार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

# आजरा साखर कारखान्याचे ऊस बिल व तोडणी वाहतूक बिल जमा : चेअरमन प्रा. सुनिल शिंत्रे

**आजरा/महानकार्य वृत्तसेवा :**

आजरा कारखान्यास दि.१६/१२/२०२१ ते ३१/१२/२०२१ या पंधरवड्यामध्ये गळीतास आलेला ५५ हजार ६३४ मे. टन. ऊसाची ऊस दर टन. प्र. मे. टन. रु. २९०० शे प्रमाणे होणारी रु १६ कोटी ७ लाखाची ऊस बिले संबंधित पुरवठा धारक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग केले आहेत. तसेच सदर पंधरवड्यातील ऊस तोडणी वाहतूक दिले २ कोटी ९० लाख इतकी रक्कम संबंधित तोडणी वाहतूकदार यांचे बँक खात्यावर जमा केली आहेत. अशी माहिती कारखान्याचे चेअरमन प्रा. सुनील शिंत्रे यांनी दिली.

आजरा साखर कारखाने सन २०२१-२२ चालू गळीत हंगाम सुरू करून ७९ दिवसात २२८३४० मे. टन. उसाचे गाळप होऊन दैनदिन साखर उतारा १२.९५ टक्के असून साखर उतारा ११.८५ टक्के प्रमाणे २ लाख ७० हजार क्विंटल साखर उत्पादन झाले आहे चालू हंगामात उसाची बिले कारखान्याने आज अखेर ऊस उत्पादकांना वेळेत अदा करण्याचे सातत्य ठेवले असून कारखान्याने १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२१ या कालावधीमध्ये गळीत असलेला १७६६३० मे. टन. उसाचे एकूण बिले रुपये ५३ कोटी ५४ लाख व तोडणी वाहतूक एकूण दिले रुपये ९ कोटी २३ लाख आदा केली आहेत. तसेच कारखाना कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्र बाहेरील सर्व सभासद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला पिकलेला सर्व ऊस विश्वासाने आमचे कारखान्याकडे पाठवीत आहेत.

त्यानुसार कारखाना व्यवस्थापनाने ठरल्यानुसार त्यांची ऊस बिले व तोडणी वाहतूक बिले मुदतीत सादर केली जात आहेत व इथून पुढेही त्याचे सातत्य कायम राहील पुढील होणाऱ्या संपूर्ण बिलाची व्यवस्था कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून कारखाना व्यवस्थापनाने केलेले आहे. कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्र बाहेरील सर्व ऊस उत्पादकांनी आपल्या पिकविला संपूर्ण ऊस थोडा विलंब झाला तरी देखील आमचे कारखान्याकडे पाठवून सहकार्य करावे असे आवाहन यावेळी चेअरमन श्री शिंत्रे यांनी केले.

तसेच कारखाना उसाच्या बाबतीत स्वयंपूर्ण व्हावा या हेतूने कार्यक्षेत्रातील उचंगी सरपण आला आहे प्रकल्प कार्यान्वित व्हावे यासाठी कारखान्यामार्फत प्रयत्न केले जाणार असून आंबे प्रकल्पातून उपसा जलसिंचन योजना आखून कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त क्षेत्र ओलिताखाली म्हणून ऊस उत्पादन वाढविण्याचे उद्दिष्ट देखील कारखाने ठेवले आहे.

यावेळी कारखान्याचे व्हा. चेअरमन आनंदराव कुलकर्णी, संचालक अशोक चराटी, विष्णुपंत केसरकर, श्रीमंती अंजना रेडेकर, मधुकर देसाई दिगंबर देसाई, सुधीर देसाई, मारुती घोरपडे, सौ. सुनिता रेडेकर, मुकुंदराव देसाई, लक्ष्मण गुडुळकर, दशरथ अमृते, राजेंद्र सावंत, अनिल फडके, मलिककुमार बुरुड , सौ. विजयालक्ष्मी देसाई, जनार्दन टोपले, आनंदा कांबळे, तानाजी देसाई, विलास नाईक, तसेच कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. टी. ए. भोसले, जनरल मॅनेजर व्हि. एच. गुजर सेक्रेटरी व्हि.के .ज्योती, मुख्य शेती अधिकारी एस. आर. चौगुले आदी उपस्थित होते.

# बरगेवाडी येथील युवकांचे कार्य कौतुकास्पद : धैर्यशील पाटील

**बरगेवाडी /महान कार्य वृत्तसेवा**

स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून तसेच स्वतःच्या आत्मविश्वासातून जिद्द व चिकाटी ठेवल्यास कोणती गोष्ट अशक्य नाही असे गौरवोद्गार भोगावती कारखान्याचे माजी अध्यक्ष धैर्यशील पाटील कौलवकर यांनी केले ते राधानगरी तालुक्यातील बरगेवाडी येथील सौरभ पाटील, अजित पाटील यांची महाराष्ट्र पोलीस पदी निवड झाल्याबद्दल सत्कार प्रसंगी बोलत होते.

कोल्हापूर जिल्ह्यातील गाव छोटं, पण नाव मोठं असणारे नऊशे लोकवस्ती बरगेवाडी गाव गेल्या पाच-दहा वर्षांत आर्मी व पोलीस भरती माध्यमातून ३५ ते ४० युवकांनी चिकाटीच्या जोरावर आपल्या योग्य अशा पोस्ट मिळवलेल्या आहेत येथील युवकांना खाकी वर्दी चे वेध लागले आहेत गावाच्या मानाने ही गोष्ट खरोखरच कौतुकास्पद आहे भरतीच्या तयारीत असलेल्या इतर युवकांनी ही भरती झालेल्या युवकांचा आदर्श घेत या छोट्याशा गावाचे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोचवावे अशाही त्यांनी युवकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

या सत्कार प्रसंगी वेळी सदाशिव पाटील, शिवाजी बरगे, हिंदुराव बरगे, शिवाजी गोविंद ,संजय बरगे, महेश बरगे,तानाजी बरगे,नामदेव बरगे,दिनकर पाटील, पुणे पोलीस विजय बरगे सिंधुदुर्ग पोलीस राहुल बरगे उपस्थित होते.


विनम्र अभिवादन



कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे शिल्पकार आणि श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन, माजी खासदार, सहकार महर्षि

स्व. दत्ताजीराव कदम (आण्णा)

यांच्या जयंती निमित्त श्री दत्त उद्योग व शिक्षण समुहाचेवतीने

वि न म्र अ भि वा द न

स्व. दत्ताजीराव कदम (आण्णा)

शर्करा औद्योगिक श्रमिक संघ (इंटक), शिरोळ

कै. दत्ताजीराव कदम कामगार कल्याण मंडळ, दत्तनगर-शिरोळ

श्री दत्त शेतकरी सह.सा.का. सेवकांची सहकारी पत संस्था मर्यादित, शिरोळ

या संस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य व श्री दत्त उद्योग समुहातील सर्व कामगार बंधू


# यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयात ‘करियर कट्टा उपक्रम’ नामफलकाचे अनावरण

**वारणानगर/महान कार्य वृत्तसेवा**



वारणानगर येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्यामार्फत महाविद्यालयात करियर कट्टा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या उपक्रमाच्या नामफलकाचे अनावरण श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाचे प्रशासकीय अधिकारी प्रा.डॉ. सौ.वासंती रासम यांच्या हस्ते आणि प्रभारी प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर यांच्या अध्यक्षतेखाली येथे उत्साहात संपन्न झाले.समन्वयक प्रा.सत्यनारायण आरडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

यावेळी प्रशासकीय अधिकारी डॉ. रासम म्हणाल्या की,वारणा परिसरातील विद्यार्थ्यांच्यासाठी आय. ए. एस. आणि उद्योजक आपल्या भेटीला या दोन प्रमुख उपक्रमांचे आयोजन वर्षभर सातत्याने करण्यात येणार आहे. त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. यानिमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी तंत्रशिक्षण विभाग यांच्यामध्ये सामंजस्य करारही झाल्याचे त्यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या की,प्रशासकीय क्षेत्रातील दिल्ली-मुंबई आणि भारत भर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांचे स्पर्धा परीक्षांची तयारी करत असलेल्या विद्यार्थ्यांच्या साठी मार्गदर्शन या उपक्रमातून प्रत्यक्ष प्राप्त होणार आहे. गरजू,गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानावर आधारित कौशल्य प्राप्त करून तो विद्यार्थी स्वतः च्या पायावर उभा राहील व पुढे चालून उद्योजक स्वावलंबी बनेल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी नोंदणी करून या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी प्रास्ताविक डॉ.एस एस खोत यांनी केले.आभार सत्यनारायण आरडे यांनी मानले.

अर्जदार तर्फे वकील- ॲड. पी.एस. कावणेकर — फौ. कि. अर्ज नं. २०५ / २०२१

**जाहीरनामा**

**मे. प्रथम वर्ग न्यायंडाधिकारीसो मे. आनंद दे. करभाजनसो, जयसिंगपूर यांचे कोर्टात**

१. सौ. सुवर्णा प्रकाश कुरणे,
व.व. ६०, धंदा - घरकाम, — अर्जदार
रा. ६४१, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर

- विरूध्द -

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारीसो,
जन्म मृत्यु नोंदणी निबंधकसो, — वि.प.
जयसिंगपूर नगरपरिषद, जयसिंगपूर
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ तसेच त्याखालील नियमावली प्रमाणे मृत्युची नोंद घालणेसाठी आदेश करणेबाबत अर्ज

ज्यापेक्षा, यातील अर्जदार हे वर नमुद ठिकाणी राहणेस असुन अर्जदार यांचे वडील कै. नेमान्ना निप्पाण्णा कांबळे यांचा मृत्यु दि. २०/०४/२०२० रोजी राजीव गांधी नगर, गल्ली नं. ८, संतोषी माता मंदिरा मागे, जयसिंगपूर येथे राहत्या घरी झाला आहे. अर्जदार यांचे वडील कै. नेमान्ना निप्पाण्णा कांबळे यांचे मृत्युची नोंद नगरपरिषद जयसिंगपूर ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील कार्यालयात करणेची अनावधानाने राहुन गेलेली आहे. त्याबाबतचा दाखला दिलेला आहे.

वर नमुद आशयाचा अर्ज जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ तसेच त्याखालील नियमावली प्रमाणे मृत्युची नोंद घालणेसाठी आदेश करणेबाबत अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, याद्वारे जाहीर करणेत येते की, यातील अर्जदार यांनी मागणी केलेप्रमाणे मयत कै. नेमान्ना निप्पाण्णा कांबळे यांच्या मृत्यूची नोंद निबंधकसो, जयसिंगपूर नगरपरिषद जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांचे कार्यालयातील अभिलेखात करणेस कोणाची हरकत असेल तर तारीख ०७/०३/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात योग्य त्या वकिलांमार्फत किंवा स्वत: हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करणेचे आहे. अन्यथा तसे न झालेस पुढील आदेश पारित करणेत येतील म्हणून दिली जाहीर नोटीस. म्हणून आज ता. २० / ०१ / २०२२ रोजी माझे सहीनीशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीरनामा प्रसिद्धीस दिला असे.

सही/-
क.लि.

शिक्का

हुकूमावरून
सही/-
सहा. अधिक्षक
ज्यु. मॅ. वर्ग १ न्यायालय, जयसिंगपूर

### नाना पाटोले यांना अटक करा : गुहागर भाजपची मागणी

**गुहागर/महानकार्य वृत्तसेवा**

भारत देशाला सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सक्षम बनवत सर्वांना सोबत घेऊन यशस्वी वाटचाल करणारे प्रधानमंत्री सन्मा. नरेंद्रजी मोदी यांच्याबद्दल आक्षेपार्य विधान करणाऱ्या नाना पटोले यांच्यावर फौजदारी गुन्हा नोंदवून त्यांना तात्काळ अटक करण्याची मागणि गुहागर तालुका भाजपच्यावतीने पोलिस निरीक्षक जाधव यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पक्षश्रेष्ठीना खुष करण्याचा व प्रसिद्धीच्या झोतात राहण्याचा पटोलेंचा बालीश प्रयत्न असल्याचे भाजप गुहागर तालुकाध्यक्ष निलेश सुर्वे यानी म्हटले आहे.


**छोटी जाहिरात**

**पोल्ट्री शेड विकणे आहे-** पत्ता- लक्ष्मीनग, नंदीवाले वसाहत रोड, शिरोळ, संपर्क- श्री श्रेयस लडगे, मो. ९०२८४८०८२८, ९८५०३०२०८१ (२१-१)


**महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग**
**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**
**कोल्हापूर पाटबंधारे विभाग (दक्षिण),कोल्हापूर**
Parent Portal :- http//mahatenders.gov.in

**कार्यालय व पत्ता :- कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग (दक्षिण), कोल्हापूर, सिंचन भवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३ दूरध्वनी क्रमांक :- ०२३१-२६५०२६३ । ई-मेल पत्ता :-** eekidsouthklp@gmail.com

**ई-निविदा सुचना क्र. २८ सन २०२१-२२**

कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग (दक्षिण), कोल्हापूर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकारी कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग (दक्षिण), कोल्हापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**जिल्हा- कोल्हापूर**

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत (रु. लक्ष) | बयाणा रक्कम | काम पूर्ण करणेचा कालावधी | कोरे निविदा संच विक्री किंमत | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ल.पा. तलाव वैरागवाडी सांडव्याची दुरूस्ती, कालव्याचे अस्तरीकरण सिसेक्शसिंग करणे, पोहोच रस्ता दुरूस्ती. | रु.३८.२९ लक्ष | रु.०.३९ लक्ष | १२ महिने | रु. २३६०/- (जीएसटीसह) | वर्ग ५ व त्यावरील |

| | | |
|---|---|---|
| ई- निविदा उपलब्ध कालावधी | :- | दि. २१/०१/२०२२ ते ०४/०२/२०२२ |
| जिओ टॅगिंग कालावधी | :- | दि. २५/०१/२०२२ ते २९/०१/२०२२ |
| ई- निविदा उघडणे | :- | दि. ०७/०२/२०२२ वेळ- १२.०० (शक्य झाल्यास) |

खालील ठिकाणी ई-निविदाबाबत सर्व माहीती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ :- http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग (दक्षिण), कोल्हापूर - कार्यालयातील सुचना फलक

सही/-
कार्यकारी अभियंता
कोल्हापूर पाटबंधारे विभाग (दक्षिण),
कोल्हापूर

जिमाका/को/जाहि/का-४/१५१/२०२१-२०२२

**ग्रामपंचायत मौजे उमळवाड, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर — जाहीर निविदा**

मौजे उमळवाड ता. शिरोळ येथे खालील प्रमाणे जाहिर निविदा मागणी करण्यात येत आहेत. तरी मान्यता प्राप्त मक्तेदार/दूकानदार/साहित्य पुरवठादार यांचेकडून निविदा मागणी करणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव/ वस्तूचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा स्विकारण्याचा दिनांक | बयाणा रक्कम २% | टेंडर फॉर्म फी | मक्तेदार वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे उमळवाड ता. शिरोळ येथे रस्ते कॉंक्रीटीकरण करणे | १,३०,०००/- | १/०२/२०२२ | २६००/- | १००/- | जि.प. कडील मान्यता प्राप्त मक्तेदार | १४ वा वित्त आयोग |
| २ | आरोग्य उपकेंद्र औषधे घेणे | ३१०८७/- | १/०२/२०२२ | - | - | GST बिले असलेले कोटेशन पध्दतीने | १५ वा वित्त आयोग |
| ३ | शाळेसाठी क्रीडा साहित्य | २५५७८/- | १/०२/२०२२ | - | - | | |
| ४ | शेती तंत्रज्ञान प्रशिक्षण/भेटी | २२९१४/- | १/०२/२०२२ | - | - | | |
| ५ | सार्वजनिक ठिकाणी निर्जंतूकीकरण मशिन व टाकी घेणे | ३१३०३१/- | १/०२/२०२२ | - | - | | |
| ६ | बोअर पुनर्भरण उपाय योजना करणे | २६७६७/- | १/०२/२०२२ | - | - | | |
| ७ | अंगणवाडी बालकांना पोषण आहार घेणे | २६२३२/- | १/०२/२०२२ | - | - | | |
| ८ | अंगणवाडी लाईट फिटींग करणे | ५०००/- | १/०२/२०२२ | - | - | | |
| ९ | अंगणवाडी संगणक/ प्रिंटर | ५११६५/- | १/०२/२०२२ | - | - | | |
| १० | मोबाईल द्वारे प.पा.पू. योजना सुरू व बंद करणे | १००००/- | १/०२/२०२२ | - | - | | |

सुचना- १) निविदा फॉर्म कार्यालयीन वेळेत देण्यात याव्यात. २) निविदा मंजूर नामंजूर करणेचा अधिकार ग्रा.पं. ने राखून ठेवला आहे. ३) निविदा समक्ष अथवा पोस्टाने वेळेत पोहचतील अशा पध्दतीने देणे.

सही/- ग्रामसेवक — सही/- सरपंच
ग्रामपंचायत उमळवाड, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर

**ग्रा.पं. निष्णप- कुंभारवाडी ता. भुदरगड जि.कोल्हापूर — जाहीर निविदा**

ग्रामपंचायत निष्णप-कुंभारवाडी, ता. भुदरगड, जि.कोल्हापूर यांचेकडून सन २०२०-२०२१/२०२१-२०२२, १५ वित्त आयोग मधून घेतलेल्या कामासाठी शिलबंद निविदा जिल्हा परिषदेकडील मान्यता प्राप्त कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फॉर्म फी | बयाना रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| | निष्णप | | | | |
| १ | रस्ता कॉन्क्रीटकरण करणे. सन २०२०-२१ | ४२१०० | १०० | ४२१ | ६ महिने |
| २ | बंदिस्त गटर्स बांधकाम करणे, सन २०२०-२१ | १,००,००० | १०० | १००० | ६ महिने |
| ३ | मागासवर्गीय वस्तीत बंदिस्त गटर्स बांधकाम करणे | १,०६,५१२ | १०० | १०६५ | ६ महिने |
| ४ | मागासवर्गीय वस्ती रस्ता कॉन्क्रीटकरण सन २०२१-२२ | ८०,००० | १०० | ८०० | ६ महिने |

नियम व अटी- १) कोऱ्या निविदा मिळण्याचा कालावधी वेळ दिनांक २१/०१/२०२२ ते २७/०१/२०२२ सायंकाळी ५.०० पर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) २) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचे ठिकाण. ग्रा.पं. कायालय निष्णप- कुंभारवाडी ३) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दिनांक २७/०१/२०२२ सायंकाळी ५.०० वा. पर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) ४) निविदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण दि. २८/०१/२०२२ सकाळी ११.०० वा. ग्रा.पं. कार्यालय निष्णप-कुंभारवाडी मासिक सभेमध्ये. ५) शासन धोरणानुसार कामाच्या बिलातून शासकीय वजावटी करून (जी.एस.टी. विमा, रॉयल्टी इ.) बिल अदा करणेत येईल. ६) निविदा सीलबंद दोन लिफाफा देत आहे. ३) कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत ग्रा.पं. निष्णप- कुंभारवाडी येथे पहावयास मिळेल. ७) निविदा प्रत्येक कामासाठी भरणे आवश्यक आहे. ८) निविदा मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवलेला आहे. ९) अधिक माहितीसाठी ग्रा.पं. कार्यालय निष्णप - कुंभारवाडी येथे संपर्क साधावा.

सही/- ग्रामसेवक — सही/- सरपंच
ग्रामपंचायत निष्णप- कुंभारवाडी, ता. भुदरगड, जि.कोल्हापूर

# घरघर लागलेला चांदी आटणी व्यवसाय घराघरात

## शेकडो कारागीर बेरोजगार मात्र, उद्योजकांच्या नफ्यात वाढ

**हुपरी/महानकार्य वृत्तसेवा**

चांदी व्यवसायात चांदी आटणीला अनन्य साधारण महत्व आहे. चांदीचे दागिने किंवा वस्तू बनविण्यासाठी सुरवातीला चांदीची आटणी काढावी लागते. चांदीचा रस पग्यात ओतून त्याच्या लगड बनविल्या जातात. त्यानंतर त्याची ओढणी आणि गुंडाळणी होते. या प्रक्रियेनंतर चांदीचे दागिने आणि वस्तू बनविण्याचा मार्ग मोकळा होतो. मात्र सद्या या व्यवसायाला घरघर लागली असून चांदी उद्योजकांनी चांदीचे आटणी स्वता घरीच काढण्यास सुरवात केली आहे. त्यामुळे शेकडो चांदी आटणी कारागिर बेरोजगार झाले आहेत.

हा व्यवसाय सांगली जिल्ह्यातील लोकांच्या हाती होता. येथील हजारो लोक हुपरी येथे स्थाईक झाले आहेत. चांदीची आटणी हा त्यांचा मुख्य व्यवसाय गेल्या अनेक वर्षापासून सुरु होता. मात्र नवीन तंत्रज्ञान आणि बदलता काळ या नुसार चांदी उद्योजकांनी व्यवसायात अनेक बदल केले आहेत.

अगदी सहज सोप्या पध्दतीने घरीच चांदीची आटणी निघत असल्याने जवळपास सर्वच चांदी व्यवसायीकांनी चांदीची आटणी घरीच काढणे पसंत केले आहे.

यामुळे नफ्यात वाढ होत असल्याची अनेक चांदी उद्योजकांनी कबूली दिली आहे. सुरवातीला कांही निवडक चांदी उद्योजकांनी घरीच चांदी आटणी काढण्याचा प्रयोग केला आणि बघता बघता ये लोन हुपरीसह परिसरात पसरले.

त्यामुळे चांदी आटणीच्या खाजगी दुकानांना कुलुपे लागली आहेत. चांदी व्यवसायात रोजगार आणि व्यवसायाच्या निमित्ताने करण्यासारखे अनेक विभाग आहेत.

याकडे आता चांदणी आटणी दुकान बंद पडलेले चांदी आटणी कारागिर वळत आहेत. हुपरी परिसरातून देशभर चांदीच्या दागिन्यांची विक्री केली जाते. या व्यवसायायला फिरती असे म्हणतात.

या फिरतीकडे अनेकांचा मोर्चा वळल्याचे दिसत आहे. त्यामुळे चांदी व्यवसायात महत्वाचा घटक समजला जाणारा चांदी आटणी व्यवसाय आता कालबाह्य होण्याच्या मार्गावर आहे.

# प्रशासक आले जयसिंगपुरा स्वच्छतेचे वाजले तीनतेरा

**जयसिंगपूर / महानकार्य वृत्तसेवा**

छत्रपती शाहू महाराजांनी कल्पकतेने निर्माण केलेल्या जयसिंगपूर शहरात सद्या स्वच्छतेचे तीनतेरा वाजले आहेत. सर्वत्र तुंबलेल्या गटारी, तुडुंब भरलेल्या कचरा कुंड्या त्यातून सुटलेली दुर्गंधी आणि निर्माण होणारे डास यामुळे शहराच्या आरोग्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. यामुळेच की काय शहरातील दवाखाने हाऊसफुल दिसत आहेत.

जयसिंगपुरचा कारभार लोकनियुक्त कारभाऱ्यांकडे होता त्यावेळी अशी परिस्थिती पहायला मिळत नव्हती. नगरसेविका रेखा अर्जुन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावी स्वच्छता मोहीम शहरात राबवली गेली होती. शहर स्वच्छ आणि सुंदर दिसत होते. मात्र प्रशासक आल्यावर याला कोणाची दृष्ट लागल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे. प्रशासकांचे आरोग्य विभागाकडे असलेले दुर्लक्ष याला कारणीभूत असल्याच्या प्रतिक्रिया शहरवासीयातून उमटत आहेत. जिल्ह्यातील कानाकोपऱ्यात कोवीड नियंत्रणासाठी प्रसंगी दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला जात असताना देखील जयसिंगपुरच्या प्रशासकांचे जयसिंगपुरातील गरजांकडे लक्षच नाही. त्यात भरीतभर म्हणून की काय स्वच्छतेचे देखील तीनतेरा वाजले आहेत. प्रशासकांनी शहरातील झोपडपट्टी परिसर, मटनमार्केट, म. फुले भाजी मंडई आणि नांदणी नाका परिसराचा दौरा करावा अशी मागणी होत आहे.

# राजेंद्र हायस्कूलमध्ये विवेकानंद जयंती उत्साहात



**वारणानगर/महानकार्य वृत्तसेवा**

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित अंबप (ता. हातकणंगले) येथील राजेंद्र हायस्कूल मध्ये स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह उत्साहात संपन्न झाला. मुख्याध्यापक प्रदीपकुमार पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले.

या सप्ताहात निबंध, वक्तृत्व, चित्रकला, टॅलेंट सर्च, रांगोळी आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकांना प्रशस्तीपत्र देण्यात आले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा सप्ताह मधील वाढदिवस 'ज्ञानशिदोरी' म्हणून साजरा झाला. ग्रंथपाल मुकेश पाटील यांनी ग्रंथप्रदर्शन आयोजित केले. संस्थेचे आजीव सेवक प्राचार्य शशिकांत काटे यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन झाले. संस्थेचे माजी सचिव प्राचार्य वाय. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व अंबपचे माजी सरपंच डॉ. बी.के.पाटील,सरपंच बी.एस. अंबपकर,उपसरपंच कृष्णात गायकवाड,ज्येष्ठ शिक्षक दिलीप चरणे, विद्यादेवी लोहार,सुनील कावळे, नवनाथ शेरखाने,रवींद्र सूर्यवंशी यांची भाषणे झाली.

# करडवाडी परिसरात जिओ नेटवर्क नॉटरिचेबलच ग्राहकांमध्ये नाराजी

**कडगाव/महानकार्य वृत्तसेवा**

करडवाडी,निष्णप,पारदेवाडी व कडगाव परिसरातील बहुतांश गावांत जिओ मोबाईल सेवा गेली दोन महिने पुर्णतः विस्कळीत झाली आहे.चार वर्षांपासुन भुदरगड तालुक्यात जिओ कंपनीने आपले जाळे विस्तारले तेंव्हापासुन सर्वर तसेच इंटरनेट गती व आकर्षक सवलतीमुळे अन्य कंपनीचे मोबाईल पोर्ट करत भागात जिओचे लाखो ग्राहक निर्माण झाले.



परंतु गेली काही दिवसांपासून या कंपनीची सेवा विस्कळीत झाली आहे. कोरोनामुळे काही ठिकाणी शाळा बंद असुन विद्यार्थ्यांना ऑनलाईन अभ्यास करताना, अभ्यासक्रम ओपन व डाऊनलोड करणेस तासनतास बसावे लागत आहे. अनेक ऑनलाईन बँकींग व्यवहार, टी.व्ही.मोबाईल रिचार्ज,लाईट बील,फोन बील,वर्क फ्रॉम होम याशिवाय अनेक जण झूम मिटींग अटेंन करत आहेत अशी अनेक कामे मोबाईल नेटवर्क नसल्याने खोळंबु लागली आहेत.करडवाडी पाच गावचे हे मध्यवर्ती ठिकाण आहे तर कडगाव हे साठ गावचे मध्यवर्ती ठिकाण आहे येथे राष्ट्रीयकृत व सहकारी बँक, महाईसेवा केंद्र तसेच दोन नेटकॅफे सेंटर आहेत. यांनाही या प्रकारामुळे नाहक त्रास होत आहे.

अनेकदा संबंधीत कार्यालयाशी संपर्क साधला असता काम चालू आहे होईल असे बोलले जाते यांचेशी अनेकवेळा संपर्क करुनही समाधानकारक परिणाम झालेला नाही. त्यामुळे ग्राहकांत संताप व्यक्त होत आहे. अनेक ग्राहकांनी आपले नंबर पोर्ट करुन इतर कंपनीकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही . 'असुन अडचण आणि नसुन खोळंबा ' अशी अवस्था या नेटवर्कची झाली असुन याची दखल घेवुन कंपनीने पुर्ववत चांगली सेवा देण्याची मागणी ग्राहक करत आहेत .

मध्येच रेंज जाण्याचा प्रकार घडत आहेत. त्यामुळे कामाच्या वेळात खूप त्रास होतो. कधी-कधी फोन न लागणे, इंटरनेटला स्पीड कमी असणे किंवा मध्येच इंटरनेट बंद होणे, असे प्रकार घडतात.अनेक वेळा मोबाइलचे नेटवर्क असताना फोन लागत नाही. दुसऱ्या व्यक्तीने आपल्याला फोन केल्यास हा क्रमांक अस्तित्वात नसल्याचे सांगितले जाते. भागात अनेक ठिकाणी व परिसरात जिओ कंपनीच्या मोबाईलला नेटवर्कच नसते.

# दानोळी हायस्कूलच्या आदित्य आळतेकरचे यश

**दानोळी/महानकार्य वृत्तसेवा:**

येथील दानोळी हायस्कूल, दानोळी मधील आदित्य आळतेकर याने बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळ,महाराष्ट्र यांचेमार्फत घेण्यात आलेल्या होमीभाभा बालवैज्ञानिक स्पर्धेच्या लेखी परीक्षेच्या पहिल्या टप्प्यात सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ, जयसिंगपूर संचलित दानोळी हायस्कूल दानोळी च्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले.



पुणे येथे होणाऱ्या प्रात्यक्षिक या पुढील टप्प्यासाठी चि. आदित्य संजय आळतेकर पात्र ठरला. तसेच इ. ६ वी चे ७ पैकी ७ विद्यार्थी प्रमाणपत्रधारक ठरले. विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका सौ. वांजुळे एस.एस.यांची प्रेरणा व विज्ञान विभाग प्रमुख ए. बी कुलकर्णी तसेच विज्ञान शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले स्कुल कमिटी चेअरमन श्री .राजकुमार पाराज पाटील दादा यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# अथर्व - दौलत साखर कारखान्याची ऊस बिले जमा

**चंदगड/महानकार्य वृत्तसेवा :**

अथर्व इंटरट्रेड प्रा.लिमिटेड लिज्ड युनिट दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना लि,हलकर्णी या कारखान्याचा २०२१-२२ चा तिसरा गळीत हंगाम सुरु असून कार्यक्षेत्रातील व सलग्न कार्यक्षेत्रातील कारखान्याकडे नोंद केलेला ऊस गळीतासाठी येत आहे.

कारखाना यावर्षी एफ.आर. पी निश्चित दरापेक्षा जादा दर देवून अथर्व इंटरट्रेड प्रा.लिमिटेड कंपनीने शेतकऱ्यांना दिलासा दिलेला आहे. या येणाऱ्या ऊसासाठी प्रति मे.टन रु.२९०१/- प्रमाणे दर जाहिर करुन वेळेत अदा केलेला आहे. यावर्षी सुरुवातीपासून ते १५ डिसेंबर २०२१ अखेर कारखान्यास २०७९८९ मे.टन इतका ऊस आलेला आहे. या ऊसाचे ६०३३.७६ लाख रुपये इतके बिल शेतकऱ्यांच्या खात्यावर यापूर्वीच जमा केले आहे. तसेच तोडणी व वाहतुक बिलेही जमा करणेत आलेली आहेत.

१५ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२१ या कालावधीत ६३४१३ मे.टन इतका ऊस कारखान्यास गळीतास आलेला आहे.

या ऊसाचे बिल १८३९.६४ लाख रुपये कारखान्याने बँकेत शेतकऱ्यांच्या खाती नुकतेच जमा केलेले आहेत. तसेच याबरोबर तोडणी वाहतुक बिलेही जमा केलेली आहेत. कारखान्याने ३१ डिसेंबर २०२१ अखेर एकूण २७१४०२ मे.टनाचे ७८७३.४० लाख रुपये इतके बिल आजअखेर शेतकऱ्यांच्या बँक खाती जमा केलेली आहेत.

याबरोबर तोडणी वाहतुक कंत्राटदाराचीही सर्व बिले अदा केली आहेत अशी माहिती अथर्व इंटरट्रेड प्रा.लिमिटेडचे चेअरमन मा. मानसिंग खोराटे यांनी दिली. कारखान्याचे उत्कृष्ट प्रतीचे कंपोष्ट खत निर्मिती केली असून साधारणतः २००० मे.टन कंपोष्टची विक्री झाली आहे. या खताचा वापर केलेल्या शेतकऱ्यांना उत्पादनामध्ये चांगला अनुभव मिळाला आहे.

सदरचे कंपोष्ट खत कारखाना साईटवरती विक्री साठी उपलब्ध आहे. तसेच शेतकऱ्यांनी नजिकच्या कारखाना सेंटरवरती मागणीची नोंदणी करावी.

# नि:स्वार्थ समाजसेवक शंकर पदकी यांचे निधन

**इचलकरंजी/महानकार्य वृत्तसेवा**



इचलकरंजी येथील जुने सामाजिक कार्यकर्ते श्री शंकर नारायण पदकी यांचे आज वयाच्या ७३ व्या वर्षी दुःखद निधन झाले.

शंकर पदकी यांनी,इचलकरंजी शहर व परिसरात, गेल्या ५० वर्षापासून, आरोग्य, लोकशिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन,लैंगिक शिक्षण, एड्स जनजागृती, व्यसनमुक्ती यासाठी सातत्याने जनजागृतीचे काम केले आहे. त्यांचे बंधु स्व.गोविंद नारायण पदकी यांच्यासमवेत त्यांनी इचलकरंजी तसेच कर्नाटक परिसरात फिरून समाजसेवेचे काम केले. अचानक चक्कर आल्याने त्यांना दवाखान्यात जात असताना वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात एक भाऊ व एक बहीण असा परिवार आहे.

त्यांच्या अंत्यविधी वेळी शहरातील इचलकरंजी नागरिक मंच,समाजवादी प्रबोधनी,मनोरंजन मंडळइचलकरंजी मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते त्यांच्या अंत्यविधीची सर्व व्यवस्था श्री हेमंत कुलकर्णी व इनाम कडून करण्यात आली.

# श्रीमती वत्सलाताई पाटील गर्ल्स हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज गारगोटी येथे शंभर टक्के लसीकरण

**गारगोटी/महानकार्य वृत्तसेवा**

डॉ.डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कोल्हापूर संचलित श्रीमती वत्सलाताई पाटील गर्ल्स हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज गारगोटी या कन्या प्रशाळेमध्ये १५ ते १८ वयोगटातील मुलींचे कोविड १९ लसीकरण मोहिमे अंतर्गत १०० लसीकरण संपन्न झाले.

भुदरगड तालुका आरोग्य विभागाच्या सहकार्याने ही लसीकरण मोहीम पूर्ण झाली. भुदरगड तालूका आरोग्य विभागाचे आरोग्य अधिकारी डॉ.कोजागिरी देसाई,आरोग्य सहाय्यक एस.एस.चोगुले,आरोग्य सहाय्यीका श्रीमती.एस.बी. जाधव,आरोग्य सेविका सौ. ए. आर.जाधव,आरोग्य सेवक पी.ए. रेडकर,डाटा एन्ट्री ऑपरेटर श्री.विनोद कोपार्डेकर या कर्मचाऱ्यांनी लसीकरण मोहीम पूर्ण केली.

यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. डी. डी. देवाळे मॅडम यांच्या उपस्थित लसीकरण मोहिमेचा शुभारंभ झाला.यावेळी सौ. प्रा.सौ एस. एस. सावंत मॅडम,सौ. प्रा.व्ही.डी. पाटील मॅडम, सौ. प्रा.एस.पी.अनावकर मॅडम,सौ. एस.यु.महाजन मॅडम,प्रा.एम. जी.मगदूम ,प्रा.जी.एस.माळी,प्रा. एस.व्ही.ठाकूर प्रा.एस.एस.माळवी श्री.आर.एस.साळोखे व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रमास मौनी महाराज बनारस शैक्षणिक संकुलाचे कॅम्पस डायरेक्ट श्री.विजयराव घोलपे याचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

# आदिशक्ती महिला मंडळ जनवाड यांच्यावतीने आज महिला भारुडाचा संगीतमय कार्यक्रम

**जनवाड/महानकार्य वृत्तसेवा**

जनवाड ता चिकोडी वार्ताहर येथील प्रतिवर्षीप्रमाणे आदिशक्ती महिला मंडळ जनवाड यांचा आज शुक्रवार दिनांक २१ १ २०२० रोजी सकाळी ११ वाजता श्री महादेव स्वामी धर्म मठामध्ये हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी खास महिलांसाठी जनवाड ग्रामपंचायतीच्या लोकप्रिय पी डी ओ मॅडम सौ शुभलक्ष्मी दाभोळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सांगलीचा स्वरसाधना कला अकॅडमी यांचा महिला भारुडाचा संगीतमय कार्यक्रम त्याचबरोबर महिलासाठी फनी गेम्स असा भरगच्च कार्यक्रम आयोजित केला आहे या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायतीच्या सर्व महिला सदस्य बरोबर गावातील प्रतिष्ठित महिला उपस्थित राहणार आहेत तरी महिला वर्गांनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी सर्वांनी उपस्थित रहावे अशी विनंती आदिशक्ती महिला मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी केली आहे.

# घोडावत पॉलिटेक्निकमध्ये पीएलसी प्रोग्रॅमिंग या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळा संपन्न

**कोल्हापूर/महानकार्य वृत्तसेवा**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकार एमएसएमई टेक्नॉलॉजी सेंटर सितारगंज व कौशल्य विकास आणि उद्योजकता विभाग, संजय घोडावत पॉलिटेक्निक, अतिग्रे यांच्या संयुक्त विद्यमाने पी एल सी प्रोग्रॅमिंग या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली अशी माहिती कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाचे प्रमुख समन्वयक प्रा.अजय कोंगे यांनी दिली.

या कार्यशाळेमध्ये पीएलसी प्रोग्रॅमिंग आवड असणारे आणि या क्षेत्रात काम करीत असणारे युवक युवतींनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. त्याचप्रमाणे या कार्यशाळेस सुशिक्षित बेरोजगार, महाविद्यालयीन विद्यार्थी, आय टी आय, डिप्लोमा, डिग्रीचे विद्यार्थी यांचादेखील सहभाग होता. या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून एमएसएमई चे मा. श्री.आदित्य चौधरी आणि त्यांची टीम लाभलेले आहेत. या कार्यशाळेस सहभागी होणाऱ्या सर्वांना एमएसएमई चे शासनमान्य ई प्रमाणपत्र मिळणार आहे. या प्रमाणपत्राचा उपयोग उद्योग आधार नोंदणीसाठी तसेच शासकीय योजनेतील कर्ज प्रकरणासाठी उपयुक्त असेल.

या कायर्शाळेच्या आयोजनाला प्रा.अजय कोंगे व प्रा. आर.एम. मुल्ला यांचे सहकार्य लाभले. या यशाबद्दल अध्यक्ष संजय घोडावत, विश्वस्त विनायक भोसले व प्राचार्य विराट गिरी यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# भडगांवमध्ये एकाचा खून

**गडहिंग्लज/महान कार्य वृत्तसेवा**

तालुक्यातील भडगांव गावात राहणारे पण मुळचे गडहिंग्लज शहरातील शितल गजानन गाडवी (वय ५०) यांच्या डोक्यात दगड टाकून पत्नी गायत्री हिने खून केल्याची फिर्याद भडगांव पोलिस पाटील उदय पुजारी यांनी गडहिंग्लज पोलिस ठाण्यात रात्री नोंद केली आहे.

मयत शितल हा अर्धांगवायूने त्रस्त असल्याने अंथरूणावर खिळून होता. याबाबत कारण स्पष्ट असल्याचे पोलिसांनी सांगितले. पुढील तपास पो. नि. रविंद्र शेळके हे करीत आहेत. यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# 'पाराशर' शैक्षणिक संकुलात विवेकानंद जयंती सप्ताह व 'ज्ञानशिदोरी सप्ताह संपन्न

**वारणानगर/महान कार्य वृत्तसेवा**

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित नवे पारगाव (ता. हातकणंगले) येथील पाराशर शैक्षणिक संकुलात स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह उत्साहात संपन्न झाला. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा वाढदिवस विद्यालयास ग्रंथदान करून 'ज्ञानशिदोरी' म्हणून साजरा करण्यात आला.

संस्थेचे आजीव सेवक प्राचार्य शशिकांत काटे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

प्राचार्य शशिकांत काटे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. या सप्ताहात निबंध, वक्तृत्व, चित्रकला,टॅलेंट सर्च, रांगोळी आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकांना प्रशस्तीपत्र देण्यात आले ग्रंथपाल विजय जाधव यांनी ग्रंथप्रदर्शन आयोजित केले. प्राचार्य शशिकांत काटे यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

यावेळी माजी प्राचार्य पी.बी. पाटील,तंत्र विभाग प्रमुख तानाजी गावडे,किमान कौशल्य प्रमुख राजेंद्र दाभाडे,प्रा.किशोर पाटील,भीमराव मोरे, बी.जी. करवडे यांची भाषणे झाली. पर्यवेक्षक माणिक कुरुंदवाडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. रंजना पाटील यांनी सूत्रसंचालन केले. बाबासाहेब करवडे यांनी आभार मानले.

# दिव्यांग लाभार्थ्यांना आवश्यक साहित्य प्रदान

## जिल्हा परिषद सदस्य राहूल आवाडे यांचे विशेष प्रयत्न

**इचलकरंजी /महान कार्य वृत्तसेवा**

दिव्यांग उन्नती अभियान अंतर्गत आणि जिल्हा परिषद सदस्य डॉ. राहुल आवाडे यांच्या प्रयत्नातून मंजूर इचलकरंजी विधानसभा मतदारसंघातील दिव्यांग लाभार्थ्यांना गुरुवारी आवश्यक साहित्य प्रदान करण्यात आले.



कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या दिव्यांग उन्नती अभियान अंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांना आवश्यक ते साहित्य दिले जाते. त्या अंतर्गत इचलकरंजी विधानसभा मतदारसंघातील ३०० लाभार्थ्यांना साहित्य मंजूर झाले आहे. याकामी जिल्हा परिषद सदस्य राहुल आवाडे यांनी पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या साहित्याचे वाटप गुरुवारी करण्यात आली. ३०० पैकी पहिल्या टप्प्यात ८० लाभार्थ्यांचे साहित्य प्राप्त झाले आहे. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर शासन नियमांचे पालन करत प्रातिनिधीक स्वरुपात लता केसरकर, अल्लाद्दीन जमादार, मल्लाप्पा मैंदर्गी, रेखा पोवार, संजय गवळी व कविता कोळी या लाभार्थ्यांना डॉ. राहुल आवाडे यांच्या हस्ते साहित्य प्रदान करण्यात आले. उर्वरीत लाभार्थ्यांना दररोज पाच याप्रमाणे साहित्याचे वाटप केले जाणार असून संबंधित लाभार्थ्यांनी जुनी नगरपालिका इमारत याठिकाणी संपर्क साधावा.

उर्वरित दिव्यांगाना आवश्यक ते साहित्य लवकरात लवकर मिळण्यासाठी पाठपुरावा करु, अशी ग्वाही यावेळी जिल्हा परिषद सदस्य डॉ. राहुल आवाडे यांनी यावेळी दिली.

... सुविचार ...

तात्काळ कृती हे सर्वात मोठे यश मिळविणारे शस्त्र आहे...

# कोणामुळे वाढते चिंता?

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचे सचिव राजेश भूषण यांनी कोरोनाची तिसरी लाट ही चिंता वाढवणारी आहे, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, दिल्ली, उत्तरप्रदेश या राज्यात रुग्ण अधिक आढळत आहेत, असेही त्यांनी विधान केले. मात्र, ही चिंता कोण वाढवत आहे? असा आमचा थेट सवाल आहे.

गुरुवार २० जानेवारी रोजी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमन पदाची निवड होती. चेअरमन आणि व्हा. चेअरमन आपल्या गटाचा होणार, पक्षाचा होणार या भावनेतून, आनंदातून शासकीय विश्रामधाम ते जिल्हा मध्यवर्ती बँक या दरम्यान जी गर्दी झाली ती कोण केली?

कोल्हापुरातील समर्थक कोणाचे? काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे, ते महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्ष. असेच चित्र देशभर आहे. ठिकठिकाणच्या सत्ताधाऱ्यांनी आपल्या बगलबच्च्यांना घेऊन सोयीचे राजकारण करायला सुरुवात केली आणि तिथे मात्र प्रशासनाने डोळ्यावर पट्टी बांधली आहे आणि याचमुळे खरेतर चिंता वाढत चालली आहे. चिंता वाढवणे ही जबाबदारी सरकारी पक्षाचीच आहे.

लोकांनी एकत्र यायचे ठरवले की त्यांच्या विरोधात पोलिस कारवाई, महसुली कारवाई, वनविभागाची कारवाई आणि राजकीय नेत्यांनी एकत्र आले की कोरोनाचा फैलाव होत नाही. राजकारणातील लोक एकत्र येतात तिथे मास्कही नसतो, गर्दी तर असतेच मग अशावेळी उपदेश करणारे शांत का बसतात? कोल्हापुरात का कारवाई झाली नाही? मग या देशाची, या राज्याची, या जिल्ह्याची नेमकी चिंता कोण वाढवत आहे? याचे उत्तर सामान्य माणूस नाही तर चिंता वाढविण्यास कारणीभूत ठरत आहेत अगदी शिरोळपासून दिल्लीपर्यंतचे राज्यकर्ते.

कोरोनाला रोखले पाहिजे त्यासाठीच्या उपाययोजना पाहिजेत. पण, सगळे निर्बंध गरीब, सामान्य, पिडीत आणि वंचितांनाच आणि भांडवलदार राजकारण्यांनी कसेही वागावे असा अर्थ होतो का? शाळा बंद ठेवली आता शाळा सुरु करायची, येथे कोरोनाचा प्रश्न. पण, जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक, गोकूळची निवडणूक, विधानपरिषदेची निवडणूक येथे गर्दी झाली नव्हती का? गर्दी करणारे कोण होते? मग तिथे कारवाई कोणती झाली? हा प्रश्न सामान्यांना नक्कीच भेडसावणारा आहे. जर कोरोनाचा फैलाव वाढत असेल तर औषध, गोळ्या, उपचार याचे नियोजन नेमके काय केले आहे? याचे उत्तर बाकी आजही सरकार देण्यास तयार नाही.

शिरोळ तालुका असेल अथवा कागल, दक्षिण कोल्हापूर असेल या ठिकाणी कोरोनाचा फैलाव वाढलाच तर रुग्णांच्यावर उपचार कुठे करायचे? किती कोवीड सेंटर निर्माण करण्यात आली आहेत तिथे ऑक्सिजन, व्हेंटीलेटर, औषध, गोळ्या किती ठेवण्यात आली आहेत? याचे उत्तर कोण आणि कधी देणार?

केवळ चिंता व्यक्त करायची आणि सामान्य माणसाला घाबरं घालून त्या वर्गात भय निर्माण करून महागाई, बेकारी, बेरोजगारी याविरुध्द वंचित वर्ग बंड करु नये, परिवर्तनासाठी उभा राहू नये असे षडयंत्र रचत रहायचे. हे काम राज्यातील आणि देशातील सरकारने जे चालू केले आहे ते कुणाच्याच हिताचे नाही. वास्तविकरित्या लोकांच्या हिताचे निर्णय घेणारे सरकार राज्यात आणि देशात असणे आवश्यक आहे. केवळ चिंता व्यक्त करणारे नको आणि सरकारी अधिकाऱ्यांनी चिंता व्यक्त करायच्या, प्रोटोकॉल पाळायचा या मर्यादा सोडल्या पाहिजेत आणि ज्यांच्या जीवावर आपला पगार होतो, घरभाडे निघते, धुलाई भत्ता मिळतो त्यांच्यासाठी खऱ्या अर्थाने काय करता येईल आणि रोग बरा करण्यासाठी कोणती औषधे देता येतील, उपचाराच्या पध्दतीत काय बदल करता येतील याकडे जर लक्ष्य दिले तर नक्कीच शिरोळपासून दिल्लीपर्यंत रुग्णांच्या संख्येवर मर्यादा येईल. आज सामान्य माणूस कोरोनाच्या भयापासून बाजूला आहे. पण, त्यांच्यात भय निर्माण करुन तो आपले अधिकार, हक्क सरकारकडे मागू नये अशी परिस्थिती सरकार जी निर्माण करत आहे ती योग्य आहे असे वाटत नाही. यासाठीच राज्य सरकारने आपल्या खोट्या लबाड आणि चुकीच्या धोरणात बदल करावा. म्हणजे नक्कीच चिंता व्यक्त करावीशी वाटणार नाही.

# क्रिकेट मैदान; खास. संजय मंडलिकांची उपस्थिती आणि तुफान फटकेबाजी

**मुरगूड/महान कार्य वृत्तसेवा :** परवा परवा जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणूका पार पडल्या, कुणाची हार झाली, कुणाची जीत झालील, सतारूढ गटाला बहुमत मिळाले. पण, या निवडणुकीत हिरो ठरले ते, सतारूढ गटाच्या विरोधात शिवसेनेचा स्वाभिमान जोपासत पॅनेल उभे करणारे खासदार संजय मंडलिक. या लढतीत खा. मंडलिकांच्या नेतृत्वगुणाच्या फटकेबाजीचे जिल्ह्याच्या तमाम जनतेने कौतुक केले.



चिमगावचे सुपूत्र असलेले खास. मंडलिक दोन-तीन दिवसापूर्वी चिमगाव मधील ६ कोटी ८३ लाखांच्या विविध विकासकामांच्या उद्‌घाटना निमित्त चिमगाव मध्ये आले होते. आरोग्य विभागाच्या इमारतीच्या पाया खुदाईच्या निमित्ताने ते क्रिकेट मैदानावर आले असता गावातील तरुण खेळाडूंनी मैदानाच्या नूतनीकरणाचा प्रश्न त्यांचे समोर मांडला होता. यावेळी खास. संजय मंडलिक यांनी या गावांमध्ये मोठे क्रीडा संकुल उभारण्याचा मानस बोलून दाखवला होता.

खा. मंडलिकांचे शेत आणि फार्म हाऊस चिमगावच्या दक्षिणेला असल्याने ते नेहमी यामार्गावरून ये जा करतात. दिवस मकर संक्रांतीचा, वेळ सकाळी ११ वाजणेची, चिमगाव (ता. कागल) येथील सस्पेन्स ग्रुपच्यावतीने भव्य क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले होते. सामन्यात दोन्ही संघांच्या खेळाडूंची लगबग सुरू होती. थंडीच्या कडाक्यामुळे सामना थोडा वेळाने सुरू होणार होता. कॉमेंट्रीटर हातामध्ये माईक घेऊन सामना सुरू करण्याची सूचना देत होते. इतक्यात मैदानाच्या पश्चिमेच्या बाजूने धुरळा उडवीत ९९०९ गाडी वेगाने मैदानात आली. सगळे खेळाडू स्तब्ध झाले. कुणालाच काही समजेना. सर्वजण आवाक् होऊन पाहू लागले. दरवाजा उघडला गेला आणि चिमगावचे सुपुत्र, जिल्ह्याचे खासदार संजय मंडलिक गाडीतून खाली उतरले. अचानक घडलेल्या प्रसंगामुळे मैदानावरील खेळाडूंमध्ये एकच गडबड सुरू झाली. काही वेळातच सर्व खेळाडूंनी खासदारांच्या भोवती गर्दी केली. खरंतर प्रत्येक गावाला खेळाच्या मैदानाची आवश्यकता आहे. तरुणांनी व्यसनाधीनते पासून दूर राहण्यासाठी, आयुष्य सुंदर व आरोग्य संपन्न राहण्यासाठी खेळ हा जीवनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतो. येणारी तरुण पिढी निरोगी व आरोग्यसंपन्न बनण्यासाठी प्रत्येकाच्या जीवनात खेळाची, व्यायामाची नितांत गरज आहे. जिल्ह्याचे खासदार संजय मंडलिक यांच्या दूरदृष्टीने हे हेरले आणि म्हणूनच चिमगावसाठी क्रीडा संकुलाची संकल्पना त्यांनी बोलून दाखवली आहे. संजयदादांनी अचानक दिलेल्या भेटीमुळे तरुण खेळाडूंच्यात थोडावेळ अस्वस्थता निर्माण झाली होती. पण, त्यांनी हसतच प्रत्येक खेळाडूंची विचारपूस करून ओळख करून घेतली आणि आपल्या नेहमीच्या शैलीमध्ये सर्वांना आपलेसे करून घेतले. मैदानाची पाहणी करून घेतली आणि आपल्या हातात बॅट घेऊन क्रिकेट पिचवर बॅटिंगसाठी उभे ठाकले. संयोजकांना कोण आनंद झाला! गोलंदाजांनी केलेल्या बॉलिंगवर खासदारांनी चौफेर फटकेबाजी केली आणि सारेच अचंबित झाले. राजकारणाच्या मैदानवरील हा योध्दा क्रिकेटच्या मैदानावरही चमकुन गेला.

एव्हाना खासदारसाहेब सामन्याच्या ठिकाणी आल्याची बातमी गावात पोहचली होती. सदा साखरचे माजी संचालक नारायण मुसळे, प्रा. संभाजी आंगज, सुनील मंडलिक, सरपंच दीपक अंगज यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी मैदानावर हजेरी लावली. यावेळी छोटू नाईक, महादेव वगदे, सागर फराकटे, महेश पुरीबुवा, सुधीर करंडे यांच्यासह गावातील व गावाबाहेरील अनेक खेळाडू मैदानावर उपस्थित होते.

# बाहुबली येथे नियोजित अहिंसा गार्डनची पायाखुदाई संपन्न

**बाहुबली/महान कार्य वृत्तसेवा:** बाहुबलीमध्ये नव्याने साकारत असलेल्या नियोजित अहिंसा गार्डनच्या पायाखुदाईचा कार्यक्रम संपन्न झाला.



बाहुबलीच्या विश्वस्त समिती व कार्यकारी समितीने अहिंसा गार्डनचा एक महत्वाकांक्षी प्रकल्प या नव्या वर्षात हाती घेतला आहे. त्याचा पायखुदाई कार्यक्रम बाहुबली महामूर्ती समोरील मैदानावर संपन्न झाला. कोरोना प्रादुर्भावामुळे हा कार्यक्रम साधेपणाने संपन्न झाला.

यावेळी बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठचे संचालक गोमटेश बेडगे, बालविकासचे चेअरमन तात्यासाहेब अथणे, अधिक्षक ए.ए. खाडे, उपमुख्याध्यापक अनिल हिंगलजे, पर्यवेक्षक नेमिनाथ बाळीकाई, व्यवसाय विभागप्रमुख अरुण चौगुले, रवींद्र देसाई, मिलिंद अकिवाटे यांच्यासह अध्यापक, अध्यापिका, सेवक उपस्थित होते.

# ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी

**कवठेगुलंद/महान कार्य वृत्तसेवा :** ऑल इंडिया मुस्लीम ओबीसी संघटना यांच्यावतीने कवठेगुलंद (ता. शिरोळ) या गावी नूतन पदाधिकाऱ्यांच्या पार पडल्या. यावेळी महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष एम.एस. गवंडी यांच्या हस्ते निवडी झालेल्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली.



या निवडीमध्ये फैयाज अहमद यांची सोलापूर शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली तर शहर उपाध्यक्षपदी पाथरवट यांची नियुक्ती करण्यात आली. रऊफ रसूल कनवाडे यांची कवठेगुलंद शहर अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

यावेळी संघटनेचे पदाधिकारी महाराष्ट्र राज्य सचिव फिरोजभैया आत्तार, कोल्हापूर जिल्हा सरचिटणीस हाजी काशीमभाई नदाफ, हातकणंगले लोकसभा मतदारसंघ प्रवक्ते दिलीप कलावंत, शिरोळ तालुका अध्यक्ष ए.जी. मुल्ला, पगारे, तालुका उपाध्यक्ष जैनुद्दीन पकाले, विभागीय अध्यक्ष बशीर मलंगफकीर, गौरवाडचे नवनिर्वाचित पदाधिकारी, तालुका सदस्य सर्फराज चौगुले, मुजाहिद चौगुले, गौरवाड शहराध्यक्ष असद जमादार व संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

# जयसिंगपुरातील उदयोन्मुख नेतृत्व रोहीत डोंगरे

**जयसिंगपूर/महान कार्य वृत्तसेवा :** एकविसाव्या शतकातील सर्वात तरुण देश म्हणून भारताची गणना संपूर्ण जगात होत आहे, त्याचा सार्थ अभिमान सगळ्या भारतवाशियांना आहे. म्हणूनच सर्वच क्षेत्रात तरुणाई कार्यरत असल्याचे पहायला मिळत आहे. विशेष म्हणजे प्रामुख्याने तरुणाईचा कल सामाजिक आणि राजकीय क्षेत्राकडे दिसत आहे आणि याचे उत्तम उदाहरण म्हणजे जयसिंगपूर नगरीतील युवा कार्यकर्ता रोहित डोंगरे (पाथरवट) आहे.



शांत आणि संयमी स्वभावाच्या या युवा कार्यकर्त्याने संघटन कौशल्याच्या जोरावर तरुणांना एकत्र करून सामाजिक सेवेत स्वत:ला झोकून दिले आहे. समाजकार्यात प्रामुख्याने गोरगरिबांना मदत करून त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी रोहित नेहमी तत्पर असतो.

शहरातील स्वच्छता मोहीम असो वा औषध फवारणी असो, प्रसंगी स्वखर्चाने राबवावे लागणारे उपक्रम असोत यामध्ये अग्रभागी राहत जनतेची सेवा हीच ईश्वर सेवा मानून स्वत:ला समाजकार्यात झोकून दिले आहे. समाजोपयोगी उपक्रम राबवून त्यामध्ये रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, रुग्णांना फळे वाटप यासारख्या कामातून समाजसेवा करत असतात.

समाजसेवेच्या ध्यासाने पछाडलेल्या या उदयोन्मुख नेतृत्वाने आता राजकीय क्षेत्रात उडी घ्यावी असा जनरेटा निर्माण होत आहे. त्यामुळे पहावे लागेल रोहितची राजकारणातील एन्ट्री शहराच्या राजकारणात कोणता नवा अध्याय निर्माण करते.

# संकेश्वर येथील गोळीबारात झालेल्या खून प्रकरणाचा दोन दिवसात छडा लागण्याची शक्यता

**संकेश्वर/महान कार्य वृत्तसेवा :** रविवार १६ जानेवारी रोजी शैलजा उर्फ गौरव्वा निरंजन सुभेदार (रा. सुभाषरोड, कमतनूर वेस, संकेश्वर) या महिलेचा सावकारीतून झालेल्या गोळीबारात बळी गेल्याने संकेश्वरासह हुक्केरी तालुक्यात सावकारसम्राटांचे धाबे दणाणले आहे. या प्रकरणात शहरात स्पर्धाच सुरु असल्याचे अधोरेखीत होत आहे. या खून प्रकरणी संकेश्वर पोलिसांनी संशयीत ८ जणांना ताब्यात घेतल्याचे समजते. या प्रकरणाचा दोन-चार दिवसात छडा लागण्याची शक्यता आहे.

दरम्यान, सुभेदार ही महिला घरी एकटी रहात होती. ती स्वत: सावकारी करायची, तिने वसुलीकरीता आपल्या हाताखाली काही माणसे ठेवली होती. ती लाखोंनी कर्जे द्यायची तर काहीवेळा वसुलीसाठी स्वत: देणेकऱ्यांच्या घरी जायची. वेगवेगळ्या कार्यालयात जाऊन कर्मचाऱ्यांना उर्मट भाषेत बोलायची, लहान-मोठ्या नेत्यांच्या घरी, कार्यालयात तिची उठ-बस असायची, असे कळते. तिच्या उद्धट, उर्मट बोलण्यामुळे तिच्या नादाला कोणी लागत नव्हते. या सावकारी पाशामुळे संकेश्वरच नव्हे तर तालुक्यात सावकारी चर्चेत आली आहे. शहरातील अनेक बड्या हस्ती छुप्या पध्दतीने सावकारी करीत असल्याचे चित्र दिसून येते. या महिलेच्या खुनामुळे सावकारी प्रकरण चव्हाट्यावर आले आहे. जिल्हा पोलीस प्रमुखांनी खास लक्ष्य देऊन सावकारांची मुळासकट पाळेमुळे शोधून गोरगरीबांना सावकारी पाशातून बाहेर काढले पाहिजे. काळ्या धंद्याला चाप लावून जनतेचा दुवा घ्यावा, अशी मागणी जनतेतून होत आहे.

# दत्तवाड मंडल अधिकाऱ्याचा मनमानी कारभार थांबणार कधी

**दानवाड/महान कार्य वृत्तसेवा:** दत्तवाड मंडल अधिकारी यांच्या अधिपत्याखाली येणाऱ्या गावातील चावडी व तहसिलदार कार्यालयाकडे येणाऱ्या चौकशी पत्रावर विनाचौकशी करता आपल्या मर्जीतील लोकांचे नियमबाह्य दाखले पात्र करुन मनमानी कारभार करण्यात येत आहेत.

मंडल अधिकाऱ्यांनी कायद्याच्या चौकटीत न बसणाऱ्या लोकांच्या चौकशी पत्रावर चौकशी न करता नियमबाह्य दाखले देत आहेत. खरोखर पात्र आहेत त्यांना अपात्र ठरविण्याचे काम दत्तवाडच्या मंडल अधिकाऱ्यांकडून केले जात आहे. त्यामुळे त्यांच्या मनमानी कार्यपध्दतीबद्दल पंचक्रोशीत तक्रारी वाढत आहेत. मंडल अधिकाऱ्यांच्या विरोधात शिरोळ तहसिलदार कार्यालयातील नायब तहसिलदार जमदाडे यांनी चौकशी करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# जयजिनेंद्र शिखरजी यात्रा संघाचे रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण

## यावर्षीही २०० भाविकांना शिखरजीचे दर्शन घडवणार : रावसो पाटील

**कोथळी/महान कार्य वृत्तसेवा :** कोथळी (ता. शिरोळ) येथील रावसो पाटील (दिवाणजी) यांचा एक आगळावेगळा उपक्रम गेली २४ वर्षे सुरू आहे. या वर्षी २५ व्या वर्षात पदार्पण करून रौप्यमहोत्सवी वर्षामध्ये प्रतिवर्षीप्रमाणे कोरोना सोशल डिस्टन पाळत यंदाही ना नफा ना तोटा या तत्त्वावर २०० भाविकांना शिखरजी दर्शनाचे आयोजन केले आहे.

जय जिनेंद्र शिखरजी यात्रा संघ कोथळी या माध्यमातून रावसो पाटील यांनी व त्यांच्या टीमने भाविकांची अविरत सेवा करीत सन २००२ पासून पंचक्रोशीतील अनेक भाविकांना शिखरजीचे दर्शन घडवले आहे. हुबळी, पुणे, सोलापूर, मुंबई, दिल्ली मार्गे पारसनाथ अशा मार्गाने यात्रा संपन्न केली आहे. प्रत्येक भाविकाला काळजीने सुखरूपपणे घेऊन जाणे व परत आणणे अशी सेवा रावसो पाटील हे करत असतात. या कामासाठी त्यांनी अभय पाटील, शितल माणगावे, राहुल बोरगावे, अक्षय वसगडे, बाबासो तांबोळी आदी तरुणांना सहभागी करून घेतले आहे.



यंदाची रौप्यमहोत्सवी २५ वी यात्रा २१ जानेवारी रोजी आयोजित केली असून दिक्षाभुमी एक्सप्रेसमार्गे पारसनाथ स्टेशन शिखरजीपर्यंत या मार्गाने जाणार आहेत. रावसो पाटील आणि सहकारी यांचा हा छंद बनत चालला आहे, हा छंद यशस्वी करण्यासाठी गावातील नागरिक, दानशूर व्यक्ती, मित्रमंडळी मदत करीत असतात. या यात्रेसाठी ते कधीही जात-पात, भेद न मानता सर्व जाती धर्माच्या भाविकांना बरोबर घेऊन या यात्रेचे आयोजन करतात.

यावेळी बोलताना पाटील म्हणाले, रेल्वे प्रशासन व सरकारने घालून दिलेल्या कोरोना पार्श्वभूमीवरील सर्व नियम पाळून सर्व भाविकांना नेऊन परत आणणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच भाविकांचे सहकार्य मिळाल्यास आयुष्यभर अशीच सेवा करीत राहीन असेही ते शेवटी म्हणाले.

# श्री गणेशा शिक्षणाचा

**महान कार्य वृत्तसेवा :** जन्माला आलेले बाळ पहिल्या दिवसापासून शिकत असते. आई, आईचा चेहरा, देहबोली, आईचा स्पर्श याद्वारे ते शिकत असते. म्हणूनच म्हणतात की 'आई हा पहिला गुरू असतो.'

बाळ जस जसे मोठे होऊ लागते तसे बाबा, आजी, अजोबा, मामा, मामी, मावशी, काका, काकी यांचाही बाळाला लळा लागतो. त्यांच्याकडूनही बाळ शिकत असते.

परिसरातील वातावरणही त्याला शिकवत असते. माऊ, कुकू, काव काव, चिऊताई हे ही बाळाचे जीवलग होतात. बाळ रांगायला लागते, पळायला लागते, पडते, परत उठते आणि पळते. बोलायला लागते, प्रश्न विचारायला लागते म्हणजेच त्याला जाणून घ्यायची, पडलो तरीही थांबायचे नाही ही नवी ऊर्जा त्याच्यात निर्माण होत असते. कोवळं वय असतं, शरीरही कोवळं असतं. मनही निर्मळ, शुध्द, शांत असतं. जसं शांत पाण्याला झालेल्या नाजूक स्पर्शाने तरंग उठत असतात तसं निर्मळ शुद्ध मनावर समाजातून मिळणाऱ्या माहितीतून तरंग उमटत असतात. बाळाचा असाच समाज शिक्षणाचा प्रवास सुरु होतो.




**शिक्षण कशाला म्हणतात?**

गुरूने, शिक्षकाने किंवा ज्येष्ठ वा श्रेष्ठ व्यक्तीने, शिष्यात, विद्यार्थ्यात किंवा कनिष्ठ व्यक्तीत संस्कार करून घडवून आणलेला बदल म्हणजे शिक्षण.

स्वामी विवेकानंद यांनी म्हंटले आहे की, 'शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जे पूर्णत्व अधीचेच विद्यमान आहे त्याचे प्रकटीकरण होय.'

महात्मा गांधींनी म्हटले आहे की, माणसाच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक अंगामधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय.

तर लोकमान्य टिळकांनी म्हटले की, नुसते लिहिता वाचता येणे म्हणजे शिक्षण नव्हे. लिहिता वाचता येणे हे ज्ञान मिळविण्याचे, सुशिक्षित होण्याचे साधन आहे. मागील पिढ्यांचा अनुभव पुढील पिढ्यात प्राप्त देणे याचे नाव शिक्षण.

शिक्षण तज्ञ डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात, शिक्षक होणे सोपे नाही. ते एक व्रत आहे. शिक्षकाला विद्यार्थ्यांच्या डोक्यात केवळ माहिती कोंबायची नाही तर त्याला ज्ञानाची अनुभूती द्यायची आहे. महिती व ज्ञान यामध्ये फरक आहे. ज्ञानाभुतीसाठी गुरूची आवश्यकता असते.

♦ 'महान कार्य' हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक विजय लक्ष्मण पवार यांनी गोदाई लक्षप्रभा प्रिटींग प्रेस, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र) येथे छापून, महान कार्य कार्यालय :- प्लॉट क्र. १०, गणेशनगर, स्टेट बँकेनजीक, शिरोळ, जि. कोल्हापूर – ४१६ १०३ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले.
♦ संपादक : विजय लक्ष्मण पवार ♦ या अंकामध्ये छापलेल्या मजकुरांशी संपादक / प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कार्यकारी संपादक- महेश विजय पवार (वादविवाद जयसिंगपूर न्यायकक्षेत) संपादकीय विभाग ०२३२२ - २३७१५९. e-Mail : dailymahankarya@gmail.com

MAHAN KARYA Printer, Publisher, Owner VIJAY LAXMAN PAWAR Printed at GODAI LAKSHPRABHA PRINTING PRESS, Gat No. 85, Plot No. 10, House No. 6517, Shirol. Tal. Shirol, Dist. Kolhapur 416103. (MS). And Published at MAHAN KARYA Karylaya, Plot No. 10, Ganesh Nagar, Near State Bank Shirol. Tal. Shirol, Dist. Kolhapur - 416103 (MS). Editor - VIJAY LAXMAN PAWAR.

# घोषीत मजूरीवाढ देवू नका : पॉवरलूम असोसिएशन

**इचलकरंजी/महानकार्य वृत्तसेवा**

यंत्रमाग कामारांच्या मजूरीमध्ये ५२ पिकास प्रती मीटर ७ पैशांची वाढ सहाय्यक कामगार आयुक्त यांनी घोषित केली आहे. मजूरी वाढीस यापूर्वीच यंत्रमागधारकांनी विरोध केला असतानाही एकतर्फी वाढ घोषित केली असल्यामुळे घोषित मजुरी कारखानदारांनी देऊ नये, असे आवाहन दि इचलकरंजी पॉवरलुम असोसिएशनच्यावतीने करण्यात आले आहे.

सन २०१३ मध्ये यंत्रमागधारक संघटना व कामगार संघटना यांच्यात दरवर्षी महागाई भत्यास अनुसरून मजूरीवाढ करण्याचा संयुक्त करार झाला होता.

परंतू यंत्रमाग उद्योगातील अभूतपूर्व मंदी, राज्य व केंद्र सरकारचे अक्षम्य दुर्लक्ष, आयात-निर्यातीचे धोरण, सुतदर संदर्भातील धोरण, सुट्या भागांची दरवाढ, वीजेच्या दरात झालेली भरमसाठ वाढ या कारणांमुळे अडचणीत आलेल्या यंत्रमाग उद्योगास दरवर्षी मजूरीवाढ देणे अशक्य बनले आहे. ट्रेडिंग असोसिएशनने खर्चीवाल्या यंत्रमागधारकांना मागील ८ वर्षात कोणतीही मजूरीमध्ये वाढ न केल्यामुळे मागील ४ वर्षांपासून यंत्रमाधारक संघटना या करारातून बाहेर पडलेल्या आहेत. तसा ठराव यंत्रमागधारकांच्या मेळाव्यामध्ये होऊन या ठरावाची प्रत सहाय्यक कामगार आयुक्त यांना दिलेली आहे. यावेळीसुद्धा कामगार संघटनांनी मजूरीवाढ मागितल्यानंतर पॉवरलुम असोसिएशनने अतिरिक्त कामगार आयुक्त पूणे व सहाय्यक कामगार आयुक्त इचलकरंजी यांना प्रत्यक्ष भेटून उद्योगाविषयी सविस्तर माहिती देत मजूरीवाढीची घोषणा करू नये अशा आशयाचे निवेदन दिले होते. असे असताना एकतर्फी मजूरीवाढ घोषित केली आहे.

अडचणीतील यंत्रमाग उद्योग विविध कारणाने अधिक अडचणीत येऊन यंत्रमाग बंद पडून यंत्रमागाची संख्याही कमी झाली आहे. केवळ इचलकरंजी केंद्रात दरवर्षी मजूरीवाढ घोषीत केल्यामुळे येथील उत्पादन खर्च इतर केंद्रापेक्षा प्रचंड वाढल्यामुळे येथील कापडास बाहेरील बाजारपेठेतून मागणी येणे कमी झाले आहे. त्यामुळे येथील उद्योग चालू ठेवणे मुशकील झालेले आहे.

अशा परिस्थितीत मजूरीवाढ देणे अशक्य आहे आणि ते देऊ शकणार नाहीत, असे पत्रक दि इचलकरंजी पॉवरलुम असोसिएशनचे अध्यक्ष सतिश कोष्टी यांनी प्रसिद्धीस दिलेले आहे.

# जयसिंगपुरात सर्दी, खोकला, ताप आणि कणकण

**जयसिंगपूर/महानकार्य वृत्तसेवा**

कडाक्याची थंडी, धुक्याची दुलई आणि खराब हवामान यामुळे शहर व परिसरात सर्दी खोकला ताप आणि कणकण अशा लक्षणाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत असून या आजारांची साथ आल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

स्वच्छ व सुंदर शहर जयसिंगपूर हे मागील परिक्षणात यशस्वी झाल्याच्या अफवा परवल्या होत्या की खरोखरच जयसिंगपुरचा सन्मान तसा करण्यात आला होता हा संशोधनाचा विषय बनून राहिला आहे. कचरा उचलण्याचा ठेका कोणी घेतला आणि कचरा कोण उचलतो हेच कळेनासे झाले आहे. दरम्यानच्या सर्व घंटागाड्याही कधी येतात ते ही कळेनासे झाले आहे. नेमके टायमिंग काय हे ही येथील जनता सांगू शकत नाही. त्यातच हागणदारीमुक्त शहराची घोषणाही हवेतच विरल्याचे चित्र मात्र दिसते. तरीही सार्वजनिक शौचालयात कांही ठिकाणी वीज आहे तर दिवे नाहीत, नळ आहे पण पाणी नाही, दरवाजा आहे तर कडी नाही. मध्यंतरी शौचालये दुरुस्तीचा ठेका दिला होता. त्या कामातच कुचराई झाल्याचा दुष्परीणाम असल्याचा आरोप नागरीकांतून होत आहे.

कांही ठिकाणी तर गटारीतून वाहणारे पाणी थेट रस्त्यावर येण्याचे प्रकारही घडले आहेत. तर अचानक आलेल्या पावसात चक्क रस्त्याच्या उंचीपेक्षा अधिक उंचीवरच गटारी बांधल्या गेल्याचे गेल्या वर्षी दिसून आले होते. एका वसाहतीत तर घराघरात पावसाचे पाणी शिरले होते. एकूणच स्वच्छतेची गंभीर समस्या लक्षात घेता नैसर्गिक आपत्तीपेक्षा ही मानवनिर्मित आपत्तीच नागरीकांना जीवघेणी ठरत आहे.

# शहरात १५ ते १८ वर्ष वयोगटातील ११६४ विद्यार्थांचे लसीकरण पूर्ण

**कोल्हापूर/महानकार्य वृत्तसेवा**

कोल्हापूर शहरामध्ये महाविद्यालय व शाळेतील १५ ते १८ वर्ष वयोगटातील ११६४ विद्यार्थांचे लसीकरण करण्यात आले.

बुधवारी सकाळी ९ ते ११ या वेळेमध्ये शहरातील ८ महाविद्यालय, शाळा व महापालिकेच्या १ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रामध्ये ही विशेष लसीकरण मोहिम राबविण्यात आली. तर प्रिकॉशन डोसमध्ये हेल्थ केअर वर्कर, फ्रंट लाईन वर्कर व ६० वर्षावरील व्याधिग्रस्त ५१८ नागरिकांना हा प्रिकॉशन डोस देण्यात आला आहे. यामध्ये हेल्थ केअर वर्कर ९९, फ्रंट लाईन वर्कर ५६ व ६० वर्षावरील ३६३ व्याधिग्रस्त नागरीकांना प्रिकॉशन डोस देण्यात आला.

बुधवारी शहरामध्ये महाविद्यालय व शाळेतील १५ ते १८ वर्ष वयोगटातील ११६४ विद्यार्थांचे लसीकरण करण्यात आले. सकाळी ९ ते ११ या वेळेमध्ये शहरातील ८ महाविद्यालय व एका प्राथमिक नागरी केंद्रामध्ये हे विशेष लसीकरण मोहिम राबविण्यात आले. यामध्ये प्रिंसेस इंदुमतीदेवी हायस्कूल अँड ज्यु.कॉलेजमध्ये २१२, कोल्हापूर हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये १४०, देशभूषण विद्यामंदीर हायस्कूलमध्ये ११९, विक्रम हायस्कूलमध्ये ३०, सेवेंथ डे इंग्लिश स्कूलमध्ये १६३, आरके वालावलकर प्रशालामध्ये ७४, आयटीआय कॉलेजमध्ये ३४०, रॉयल इंग्लिश स्कूलमध्ये ७८ व प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र फुलेवाडी येथे ८ विद्यार्थांचे लसीकरण करण्यात आले.

## शरद कृषी महाविद्यालयात ऑनलाईन पध्दतीने सूर्यनमस्काराचे आयोजन

**जैनापूर/महानकार्य वृत्तसेवा**

जैनापूर येथील शरद कृषी महाविद्यालयच्या वतीन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमा अंतर्गत महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ऑनलाईन पध्दतीने सूर्यनमस्कार (आझादी का अमृतमहोत्सव - भारत) आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाहुबली माणगावे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. दादासाहेब मगदूम तसेच ऑनलाईन स्वयंसेवक उपस्थित होते. क्रीडा शिक्षक प्रा. श्री. मगदूम यांनी सूर्यनमस्काराचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्या पध्दतीने राष्ट्रीय सेवा योजनेचा १०० स्वयंसेवकांनी सूर्यनमस्कार केले.

# यंत्रमाग कामगारांना मजूरी वाढ द्यावी : कॉ. भरमा कांबळे

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

दरवर्षी जी महागाई वाढते, त्याप्रमाणे यंत्रमाग कामगारांचा वर्षात दोनवेळा महागाई भत्ता वाढत असताना तो देण्यास मालक विरोध करत आहेत. यंत्रमागधारकांच्या लढ्यात कामगारांना सोबत घ्या. ट्रेडींगवाल्यांनी वाढ केली नाही म्हणून कामगाराच्या पोटावर मारु नका. दोघे मिळून लढा यशस्वी करुया. पण कामगारांचे हाल समजून घेऊन मजुरीवाढ द्यावी, असे आवाहन लालबावटा जनरल कामगार युनियनचे जनरल सेक्रेटरी कॉ. भरमा कांबळे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

पत्रकात, यंत्रमाग कामगारांची मजुरीवाढ घोषित झाली आणि कामगारांना महागाईशी तोंड देण्याची काहीशी ताकद आली. पण येथील यंत्रमागधारक मजुरीवाढ दिल्यास धंदाच संपणार, इचलकरंजी ओस पडणार, यंत्रमाग विकावे लागणार असे बोलू लागले आहेत. जो कामगार १२-१२ तास राबतो, घाम गाळतो, १० किंवा १२ माग चालवतो आणि मालकाचे उत्पन्न वाढवितो. त्याच कामगाराला दरवर्षी जी महागाई वाढते, त्याप्रमाणे यंत्रमाग कामगारांचा वर्षात दोनवेळा महागाई भत्ता वाढतो. सन २०१७ पासून विजेचे, सूताचे, सायझिंगचे दर २० टक्के वाढले. बाजारातील सर्व वस्तूंचे दरही वाढले. मागाच्या सुट्या भागाचे दर वाढले, घराचा-कारखान्याचा घरफाळा वाढला. या सर्व दरवाढीला मालकांनी विरोध केला नाही. कामगारांनी मिळवून दिलेल्या नफ्यातून वाढलेले सर्व कर आणि वाढ दिली. मात्र कामगाराला मागील पाच वर्षात एकपैसा देखील मजुरीवाढ दिलेली नाही. मालकांची जशी विजेची दरवाढ झाली, बाजारातील वस्तूंचे दर वाढले, पेट्रोल डिझेल, गॅसचे दर वाढले तशी दरवाढ कामगारांच्यावरसुध्दा झालेली आहे.

यंत्रमागधारकांचे वीज बिल, सुताचे दर वाढल्यास, कापडाचे दर पडल्यास, सायझिंग दर वाढल्यास एकटे लढू नका. त्या लढ्यात तुमच्यासोबत कामगारांना घ्यावे. त्यांनी वाढविले म्हणून आमच्या पोटावर मारु नका. दोघांनी मिळून लढा यशस्वी करु. मात्र कामगारांचे हाल समजून घ्या आणि त्याला मजूरीवाढ द्या, असे कॉ. कांबळे यांनी म्हटले आहे.

# हेरे सरजांम प्रकरणाच्या निर्गतीसाठी तातडीने बैठकांचे आयोजन करणार : प्रांताधिकारी

**चंदगड/महानकार्य वृत्तसेवा**

चंदगड तालुक्यातील हेरे सरजांम प्रकरणाची तातडीने निर्गत करण्यासाठी प्रत्येक मंडल स्तरावर बैठकींचे आयोजन करणार असल्याचे प्रांताधिकारी बाबासाहेब वाघमोडे यांनी सांगितले.

सोमवारी तहसिल कार्यालयात आमदार राजेश पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या शेतकऱ्यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. चंदगड तालुक्यातील ४७ महसूली गावामध्ये व वाडी विभाजनानंतरचे गांवामध्ये हेरे संरजाम वतनाच्या जमीनी असून सदर जमीनी प्रत्यक्ष कसत, वहिवाटीस असलेल्या शेतकऱ्यांना व कुळांना शासन निर्णय दि. ३१ मे २००१ मधील परिपत्रक क्र. १ ते ४ नुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन तात्काळ व प्रथम प्राधान्याने निर्गत करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी निर्देश दिलेले आहेत.

तसेच दि. ३१मे २००१ च्या परिपत्रकात सुचित केल्याप्रमाणे सर्व हेरे सरंजामचे गावातील कामकाज पुर्ण करण्याच्या अनुषंगाने प्रत्येक मंडळ व सजा निहाय कालबध्द कार्यक्रमाचे नियोजन करणे बाबत चंदगड तहसिलदार यांना निर्देश दिलेले आहेत.

चंदगड तालुक्यातील ४७ महसूली गावे व वाडीविभाजना नंतरचे गावातील सर्व खातेदारांना आवाहन करण्यात येते की, जे खातेदार हेरे सरंजाम इनामाखाली जमिनी धारण करत आहेत.

अशा खातेदारांनी संबंधित सजातील सर्व तलाठी, मंडळ अधिकारी, तहसिलदार चंदगड येथे विहीत नमुन्यातील अर्जामध्ये आपला गट नंबर / सर्व्हे नंबर नमुद करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुर्ततेसह प्रकरणे सादर करावीत.

तसेच ज्या खातेदारांना नजराना रक्कम भरणे बाबत कळविले आहे. त्या खातेदारांनी नजराना रक्कम भरुन चलनाची प्रत तहसिलदार कार्यालय चंदगड येथे जमा करावी.

अशी परिपुर्ण प्रकरणे प्राप्त झाल्यानंतर शासन परिपत्रकानुसार निकाली काढण्यात येणार असल्याचे उपविभागीय अधिकारी वाघमोडे यांनी सागितले.

# शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेस सुरु करण्याची परवानगी द्यावी : मागणी

**गुहागर/महानकार्य वृत्तसेवा**



महाविकास आघाडी सरकारने सरसकट शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेस बंदचा घेतलेला तुघलकी निर्णय अत्यंत चुकीचा व तितकाच दुर्दैवी आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर दुरगामी परिणाम होत आहेत. ऑनलाईन शिक्षण हे सर्वसामान्य गोरगरीब विद्यार्थी व दुर्गम/अतिदुर्गम खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत नाही.

दोन वर्षांपासून शाळा,महाविद्यालये बंद असल्याने ग्रामीण व शहरी भागातील शैक्षणिक दरी वाढुन सर्वसामान्य जनतेची मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर फेकले जात आहेत. यामुळे मुलांचे शिक्षणाचे गांभीर्य नष्ट होत असून त्यांचे नुकसान होत आहे.

राज्यभरात सर्वच व्यवसाय कोरोना निर्बंधासहीत सुरु आहेत. तेव्हा सरकारने कोरोनाचे नियम लावून शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेस सुरु करण्याची परवानगी द्यावी.

सरकारने दिनांक २६ जानेवारी पर्यंत शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेस सुरू करण्याचा आदेश द्यावा अशी मागणी गुहागर तालुका भारतीय जनता पार्टीच्यावतीने लेखी निवेदनाद्वारे सन्मा.तहसीलदार गुहागर तालुका यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे करण्यात आली आहे.यावेळी भाजप तालुकाध्यक्ष नीलेश सुर्वे, सरचिटणीस सचिन ओक, आरे गाव सरपंच श्रीकांत महाजन,चिटणीस साईनाथ कळझुणकर,नगरपंचायत भाजप गटनेते उमेश भोसले, शहराध्यक्ष संगम मोरे, नगरसेविका भाग्यलक्ष्मी कानडे, युवामोर्चा शहर अध्यक्ष मंदार पालशेतकर, उपाध्यक्ष अमोल गोखले, श्रीमती अर्चना खरे, गणेश भिडे आदी सह बहुसंख्य भाजप कार्यकर्ते,शिक्षण प्रेमी यावेळी उपस्थित होते.

# विनामास्क, सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान केलेल्या नागरीकांकडून २७ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल

**कोल्हापूर/महानकार्य वृत्तसेवा**

शहरामध्ये विनामास्क फिरणाऱ्यां ४५ नागरीकांकडून २२ हजार ५००, सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्या २ नागरीकांकडून २००० व सोशल डिस्टंन्स न ठेवलेल्या ३ नागरीकांच्याकडून ३००० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. महापालिकेच्या सात भरारी पथकामार्फत शहरात कारवाई करुन ५० नागरीकांच्याकडून २७ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

सदरची कारवाई शुक्रवार पेठ, शनिवार पेठ, लक्ष्मीपुरी परिसर, गंगावेश, रंकाळावेश, उत्तरेश्वर, लक्षतिर्थ वसाहत, महाद्वार रोड, शिवाजी पेठ, फुलेवाडी, नाना पाटीलनगर, जरगनगर, रायगड कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, साळोखेनगर, संभाजीनगर, खासबाग, जवाहरनगर, उद्यमनगर, प्रतिभानगर, शाहुनगर, राजारामपुरी परिसर, शाहुपुरी परिसर, टेंबलाईवाडी, विक्रमनगर, राजेन्द्रनगर, सायबर चौक, मार्कट यार्ड, रुईकर कॉलनी, कदमवाडी, सदर बाजार, कसबा बावडा, लाईन बाजार, ताराबाई पार्क, नागाळा पार्क, एसटीस्टॅण्ड परिसर, रेल्वे स्टेशन परिसरात करण्यात आली. शहरामध्ये गर्दी वाढत असलेने नागरीकांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. सन, समारंभ, धार्मिक स्थळे, भाजी मार्केट याठिकाणी नागरिकांनी नियमितपणे मास्क व सॅनिटाईजरचा वापर करावा तसेच सामाजिक अंतराचे पालन करावे असे आवाहन महापालिका प्रशासक डॉ.कादंबरी बलकवडे यांनी केले आहे.

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी नितीन धूत यांची निवड

**इचलकरंजी/महानकार्य वृत्तसेवा**



महाराष्ट्रातील सर्व उद्योग व्यापार क्षेत्रामध्ये कार्यरत सर्व संघटनाची शिखर संस्था असलेल्या 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ग्रीकल्चर, मुंबई या शतक महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या स्वीकृत सदस्यपदी वेस्टर्न महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे व्हाईस प्रेसिडेंट नितीन धूत यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांनी ही निवड जाहीर केली. नितीन धूत हे क्रेडाई इचलकरंजी चे ते संस्थापक अध्यक्ष असून बिल्डर्स असोशिएशन ऑफ इंडिया इचलकरंजी चे व्हाईस प्रेसिडेंट त्याचबरोबर ग्लोबल मारवाडी चॅरिटेबल फौंडेशनचे चे व्हाईस प्रेसिडेंट आहेत. उद्योग क्षेत्राबरोबरच नितीन धूत हे सामाजिक कार्यातही अग्रेसर असतात. श्री. धूत यांच्या या कार्याची दखल घेऊन 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ग्रीकल्चर, मुंबई या संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या स्विकृत सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतुन अभिनंदन होत आहे.

# डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात आज राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**सांगली/महानकार्य वृत्तसेवा**

मूलभूत व उपयोजित विज्ञानातील समकालीन प्रवाह या विषयावर दोन दिवसांची राष्ट्रीय परिषद दिनांक २१ व २२ जानेवारी २०२२ रोजी ऑनलाईन पद्धतीने डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथे आयोजित केली आहे. ही परिषद चौथ्यांदा आयोजित केली जात आहे. यापूर्वी तीन वेळा ही परिषद प्रत्यक्षात घेतली असून यावर्षी कोरोनाच्या पार्शवभूमीवर ही परिषद ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येत आहे असे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी प्रत्रकारांशी बोलताना सांगितले. ते पुढे म्हणाले या परिषदेसाठी संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले आहेत तर या परिषदेत डॉ. श्रीनिवास कावेरी (फ्रान्स), डॉ. विवेक धाम (युरोप), डॉ. संजीव मरदूर (कोरिया), डॉ. ए. डी. जाधव (कोल्हापूर), डॉ. एस. जी. दळवी (पुणे) व डॉ. हबीब पठाण (पुणे) अशी प्रमुख वक्ते मार्गदर्शन करणार आहेत.

या राष्ट्रीय परिषदेमध्ये विज्ञान क्षेत्रातील सर्व विभागाचे मान्यवर आपले विचार मांडणार असल्याने ही परिषदेचा समाजातील सर्व घटकांना उपयोग होईल. या कार्यक्रमाचे आयोजन झूम या ऑनलाईन प्लॅटफॉर्म वर होणार आहे. विज्ञान क्षेत्रातील विद्यार्थी, शिक्षक व रिसर्च स्कॉलर्स यांनी जास्तीत जास्त स्वरुपात आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी केले.

या परिषदेच्या आयोजनासाठी समन्वयक डॉ. व्ही. बी. आवळे व टीम अथक परिश्रम घेत आहेत.

भारती विद्यापीठ प्र-कुलगुरू, कार्यवाह व राज्यमंत्री मा.ना. डॉ.विश्वजित कदम, कुलपती मा.डॉ. शिवाजीराव कदम, भारती विद्यापीठ शालेय शिक्षण समिती अध्यक्षा मा. विजयमाला कदम कुलगुरु डॉ. माणिकराव सांळुखे, विभागीय मानद संचालक मा. डॉ. एच.एम. कदम, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी या परिषदेस शुभेच्छा दिल्या आहेत.

# अथर्व - दौलत साखर कारखान्याचा वजन काटा चोख

**चंदगड/महानकार्य वृत्तसेवा**

अथर्व इंटरट्रेड प्रा.लिमिटेड लिज्ड युनिट दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना लि,हलकर्णी या कारखान्याचा २०२१-२२ चा तिसरा गळीत हंगाम सुरु आहे. मा.जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर यांचे आदेशानुसार आज दिनांक १८ जानेवारी २०२२ रोजी श्री. आर. एन.गायकवाड, उपनियंत्रक, वैद्यमापन शास्त्र, कोल्हापूर यांचे भरारी पथकाने दुपारी २.०० वाजता कारखाना ठिकाणी अचानक भेट देवून वजन काटयाची तपासणी केली. यामध्ये ऊस भरुन आलेल्या ट्रॅक्टर,ट्रक, बैलगाडी व इतर वाहनाची दु. २ ते ५ वाजेपर्यत तीन तास तंतोतंत तपासणी करणेत आली.

सदरची वाहने पुन्हा एकदा वजन काटयावर भर व रिकामी वाहन तपासणी केली तसेच बिडाच्या वजनाचीही चाचणी घेणेत आली तीही बरोबर व योग्य असल्याचे निदर्शनास आहे. सदरच्या तपासणीमध्ये अथर्व इंटरट्रेड प्रा.लिमिटेड लिज्ड युनिट दौलत साखर कारखान्याचा वजन काटा बिनचुक व निर्दोष असल्याचे सिध्द झाले. तसेच काही शेतकऱ्यांनाही बोलावून त्यांच्या समक्ष वजनाची खात्री करणेत आली याबाबत या शेतकऱ्यांचेही जबाब नोंदविणेत आले. अथर्व इंटरट्रेड कंपनीने सन २०१९-२० पासून कारखाना चालविणेस घेतला.

या कारखान्याच्या वजनाकाटया बाबत विश्वासार्हता टिकवून ठेवली असून कारखान्याला ऊस पुरवठा करणारा शेतकरी समाधानी व आनंदी आहे. आजअखेरच्या तिसऱ्या गळीत हंगामापर्यत कारखाना व्यवस्थापनाने आपल्या या कारखान्याची चांगली विश्वासार्हता निर्माण केली आहे. यापढेही ही विश्वासार्हता कायम राहणार असून शेतकऱ्यांच्या मालाचे निश्चित वजन व चांगला भाव देणार आहोत असे चेअरमन श्री. मानसिंग खोराटे यांनी सांगितले. वजन काटा निर्दोष ही बाब कारखाना व्यवस्थापनाच्यादृष्टीने अभिमानाची आहे. यामूळेच कार्यक्षेत्र व कार्यक्षेत्राबाहेरील ऊस उत्पादक शेतकरी या कारखान्यास ऊस घालणेस नेहमीच उत्सुक राहतात. दिवसेदिवस कारखान्याची विश्वासार्हता वाढत असून कारखान्याबाबत एक आपूलकीचे व जिव्हाळयाचे नाते कारखाना परिसरात निर्माण झाले आहे. या सदभावना कारखान्याच्या हिताच्या दृष्टीने उपयोगी येवून भविष्यात याची चांगला लाभ स्थानिक शेतकऱ्यांना होईल यात शंका नाही. कारखान्याने वेळेत ऊस उचल व प्रती पंधरवडा वेळचेवेळी ऊस पेमेंट करुन शेतकऱ्यांना दिलासा दिलेला आहे. या भरारी पथकामध्ये श्री आर.एन.गायकवाड, उपनियंत्रक वैद्यमापन शास्त्र, कोल्हापूर, श्री. एस.पी.सोनवणे, विशेष लेखा परिक्षक, सह.संस्था (साखर) कोल्हापूर, श्री.एम.डी.पाटील, निरीक्षक, वैद्यमापन शास्त्र, गडहिंग्लज, तहसिल कार्यालय, चंदगडचे प्रतिनिधी श्री. तांबोळे, श्री.मकानदार, पोलिस ठाणे, चंदगड व इतर अधिकाऱ्यांचा समावेश होता. या भरारी पथकाने तपासणीअंती समाधान व्यक्त करुन वजन काटे निर्दोष असलेचे कारखान्याला प्रमाणपत्र दिले. या तपासणीवेळी युनिट हेड श्री. धनंजय जगताप, सेक्रेटरी श्री. अनिल काटे, शेती अधिकारी श्री. सदाशिव गदळे, केनयार्ड सुपरवायझर श्री. पी.डी.सरवदे उपस्थित होते.

# राशिवडे ते म्हालसवडे रस्त्याचे काम सुरु

**राधानगरी/महानकार्य वृत्तसेवा :**

नागेश्वर मंदिर विकास अंतर्गत राशिवडे ते म्हालसवडे रस्त्याचे काम लवकरच सुरु झाले आहे. बरेच वर्ष राशिवडे गावातील दि व्यापारी असोसिएशन, नागेश्वर व्यापारी असोसिएशन, नागेश्वर भक्त मंडळ, म्हालसवडे, कांचनवाडी, चाफोडी या भागातील शेतकऱ्यांची व नागरिकांची या रस्त्यासाठी मागणी होती. यासाठी राधानगरी भुदरगडचे आमदार प्रकाशराव आबिटकर, आमदार पी. एन. पाटील व खासदार संजय मंडलिक यांच्याकडे मागणी केली होती. त्यानुसार प्रधानमंत्री सडक योजनेतून या रस्त्याच्या ५ कि.मी साठी १.६ कोटी इतका निधी मंजूर झाला आहे. पुढे एक ते दोन वर्षांमध्ये या रस्त्याचे काम पूर्ण होईल. त्याच्यामुळे राशिवडे गावातील व्यापार व्यवसाय वृद्धिंगत होण्यास मदत होईल, नागेश्वर मंदिराचा विकास, शेतकरी यांना वाहतुकीसाठी सोयीचे होईल, तसेच वाढीव गावठाणसाठी या रस्त्याचा उपयोग होईल. असा विश्वास राशिवडेचे माजी सरपंच व युवा नेते सागर धुंदरे (भैय्या) यांनी व्यक्त केला आहे. याबद्दल खासदार संजय मंडलिक, आमदार प्रकाशराव आबिटकर व आमदार पी. एन. पाटील यांचे सर्व राशिवडे ग्रामस्थ यांच्यावतीने आभार मानले जात आहे.

## हातकणंगले विधानसभा मतदार संघात जल्लोष

# पक्ष, संघटना बांधण्यास मोठी संधी

लक्ष्मीवाडी/महान कार्य वृत्तसेवा: आमदार राजूबाबा आवळे यांची कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उपाध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे निवड झाली. या निवडीनंतर हातकणंगले विधानसभा मतदार संघात काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांत जल्लोषाचे वातावरण तयार झाले.

**। मोठी संधी...**

आम. राजूबाबा आवळे यांना काँग्रेस पक्षाने प्रथम पक्षाची उमेदवारी दिली, ते आमदार झाले. परत पक्षाने जिल्हा बँकेची उमेदवारी दिली, ते बँकेचे संचालक झाले, व्हा. चेअरमन झाले आणि खूप मोठी संधी या निमित्ताने पक्षाने त्यांना दिली आहे.

**। आव्हान...**

त्यांच्यापुढे या संधीच्या निमित्ताने खूप मोठे आव्हान उभे राहिले आहे. इचलकरंजी, शिरोळ विधानसभा मतदार संघात पक्ष अखेरची घंटा मोजत आहे. पण, दोन्ही विधानसभा मतदार संघात पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आणि मतदार मोठ्या संख्येने आहेत. त्यांना दिलासा देणे, त्यांचे प्रश्न समजावून घेणे आणि ते सोडविणे आणि बँकेच्या माध्यमातून आर्थिक लाभाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवून पक्ष मजबूत करणे हे मोठे आव्हान आहे.



**। संपर्क...**

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शिरोळ, हातकणंगले आणि इचलकरंजी या तीन विधानसभा मतदार संघात शाखांचे जाळे मोठे आहे. व्हा. चेअरमन या नात्याने ते किती संपर्क ठेवतात, महिन्यातून कितीवेळा शाखांना भेटी देतात हे आता पहावे लागणार आहे.

**। दूध उत्पादक...**

गोकुळ आणि जिल्हा बँक ही दोन्ही सत्ताकेंद्रे दोन्ही काँग्रेसच्या हाती आहेत. त्यामुळे दूध उत्पादक मोठ्या आशेने बँक कर्ज देईल, व्याज घेणार नाही आणि व्यवसाय वाढवेल या भावनेत असणार आहेत. यासाठी नेमके धोरण बँक काय घेते आणि आम. आवळे कसे राबवतात यावर त्यांची लोकप्रियता अवलंबून राहणार आहे.

**। जल्लोष...**

आमदार आवळे आमदार झाले कार्यकर्त्यांनी हातकणंगले तालुक्यात जल्लोष केला. बँकेचे व्हा. चेअरमन झाले, जल्लोष केला. आता या जल्लोषाला रोजगार निर्मितीची गरज आहे.

**। रोजगार निर्मिती...**

हातकणंगले विधानसभा मतदार संघात आमदार आणि जिल्हा बँकेचे व्हा. चेअरमन अशी दोन पदे असताना रोजगार निर्मिती झालीच पाहिजे असा आग्रह जर कुणी धरला तो चुकीचा होणार नाही. वेगवेगळ्या महामंडळाच्या माध्यमातून कर्ज, व्याज आणि मिळणारे अनुदान बँकेला लिंकिंग केले तर वेगवेगळे छोटे-मोठे व्यवसाय बँक आणि महामंडळाच्या माध्यमातून आम. आवळे उभा करु शकतात.

**। मेंढपाळांना मदत...**

हातकणंगले विधानसभा मतदार संघात मेंढपाळांची संख्या अधिक आहे. बँकेच्या धोरणात काही बदल करुन मेंढपाळांना बिनव्याजी कर्ज देणे हे धोरण त्यांनी स्विकारावे, अशी अपेक्षा लोकांची आहे.

# पाहिजे होते ते मिळाले; जबाबदारी वाढली

## महामंडळांची कर्जे कागदावर नव्हे लोकांच्यापर्यंत पोहोचली पाहिजेत

कागल/महान कार्य वृत्तसेवा : कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत मंत्री हसन मुश्रीफ यांच्या नेतृत्वावर जिल्ह्याने शिक्कामोर्तब केला आणि संचालकांनी त्यांना चेअरमन बनविले. जे हवे होते ते ना. मुश्रीफ यांना आता मिळाले आहे.

**। कागदावर नको...**

आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून गायी, म्हैशीसाठींची कर्जे कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँक देणार अशी मंत्री मुश्रीफ यांनी गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत आणि त्यानंतर केली. पण, ही घोषणा आता कागदावर नको आहे तर त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली पाहिजे आणि जिल्ह्यात कागलशिवाय अन्य तालुके आहेत, तेथील मराठ्यांच्यापर्यंत ही योजना पोहोचली पाहिजे ही रास्त अपेक्षा लोकांची असणार आहे.



**। संघटन...**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शाहूवाडी, इचलकरंजी आणि कोल्हापुरातून हळूहळू मावळत चालला आहे. पक्ष संघटनवाढीसाठीही मंत्री मुश्रीफ काय करतात हे अध्यक्षपदानंतर पहावे लागेल. बँकेच्या निवडणुकीत पक्षाच्या सामान्य कार्यकर्त्यांना जी जिल्हाभर घेतलेली भूमिका ही मुश्रीफ यांच्या नेतृत्वाला बाळसे देणारी होती.

**। बिनव्याजी...**

सेवा सोसायटीच्या माध्यमातून कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्याने जी रक्कम बँकेत सेवा सोसायटीच्या माध्यमातून ठेव ठेवली आहे ती खूप मोठी आहे. त्यामुळे शेतकऱ्याची इच्छा आहे ७ लाखापर्यंतचे कर्ज बिनव्याजी असावे. पण, एका एकराला बँकेने कर्जमर्यादा ६ लाखाची तरी ठेवावी. शेतीचा विकास आणि विस्तार करण्यासाठी इतक्या रक्कमेची गरज आणि तीही बिनव्याजी आवश्यक आहे.

**। कागलमध्ये फाईट...**

राजकीयदृष्ट्या हे अध्यक्षपद मंत्री मुश्रीफ यांच्या विधानसभेसाठी अतिशय महत्वाचे मानले जाते आणि ते आहे. बँकांच्या शाखा कागल तालुक्यात मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे आता पहावे लागेल मंत्री मुश्रीफ शाखा, सेवा संस्थांच्या माध्यमातून सामान्य शेतकऱ्यापर्यंत पोहोचण्यासाठी नवी योजना कोणती आणतात? कारण कागलमध्ये विधानसभेसाठी फाईट टाईट असणार आहे.

**। तरुणांना...**

बँकेच्या माध्यमातून तरुण सक्षम बनविण्यासाठी मंत्री मुश्रीफ नेमकी कोणती भूमिका घेतात याची उत्सुकता तरुणांच्यात असणार आहे.

**। श्रावणबाळ...**

इंदिरा गांधी, संजय गांधी या योजनांची पेन्शन जिल्हा बँकेच्या शाखेतून कोणताही त्रास लाभार्थ्यांना न होता मिळाली पाहिजे आणि कोणत्याही प्रकारचे डिपॉझिट अथवा रक्कमेतील एक रुपयाही कट न होता लाभार्थ्यांच्या हातात मिळाली पाहिजे असे मत मंत्री मुश्रीफ यांना श्रावणबाळ म्हणणाऱ्या लाभार्थ्यांची असणे साहजिकच आहे. बँकेत अध्यक्षपदी संधी मिळताच गरीब, वंचित आणि पिडीतांच्यातून आनंद व्यक्त होत आहे.

# जि.प.च्या पार्श्वभूमीवर यड्राव येथे बैठक

यड्राव/महान कार्य वृत्तसेवा : कोल्हापूर जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यड्राव येथील उपनगरात एक गुप्त बैठक पार पडली आहे. शिरदवाड येथील एक युवा नेता या बैठकीला उपस्थित होता असे सांगण्यात येते.

कोणत्याही परिस्थितीत यंदाची निवडणूक कवठेमहांकाळ टाईप लढवायची अशी भूमिका येथे व्यक्त केल्याचे कळते. निवडणुकीची रणनिती पुढच्याच आठवड्यात जाहीर करायची, अशी चर्चा झाल्याचे कळते.

# गिजवणे ओढा मार्गावरील खड्डे मुजवावेत; सेनेची मागणी

गडहिंग्लज/महान कार्य वृत्तसेवा : गिजवणे ओढा ते गावातील एका वर्तमानपत्राच्या कार्यालयापर्यंतचा रस्ता अत्यंत खराब झाला आहे. ते खड्डे मुजवावेत अशी मागणी शिवसेनेचे उपशहरप्रमुख काशिनाथ श्रीशैल्य गडकरी, प्रताप खेबाडे, संभाजी येडुरकर, पवन नाईक, संतोष मदकरी, गंगाधर नाईक आदी प्रमुखांनी एका निवेदनातून गडहिंग्लज विभागाचे सार्वजनिक बांधकाम उपअभियंता यांच्याकडे केली आहे. गडहिंग्लज ते आंबोली या मार्गावर वर्दळ मोठी असते. पण, खड्डे पडले आहेत. शिवाय पर्यटक या मार्गावरुन मोठ्या प्रमाणात जातात. त्यामुळे या मार्गावरील खड्डे तात्काळ मुजवावेत अशी मागणी त्यांनी निवेदनातून केली आहे. निवेदन वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवू असे आश्वासन सा.बां. खात्याने दिल्याचे सांगण्यात आले.



# दानोळीत ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिग

दानोळी/महान कार्य वृत्तसेवा: दानोळी (ता. शिरोळ) येथे ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिग साचले आहेत. ग्रामपंचायतीने अभ्यास समिती नेमून समितीचा अहवाल घेऊन योग्य वाटले तरच कचरा उठाव करावा, अशी अपेक्षा फुकट मत देणाऱ्या नागरिकांतून व्यक्त होत आहे. कोरोनाची तिसरी लाट गावात येऊ नये यासाठी ग्रामपंचायतीने कडेकोट उपाययोजना कराव्यात, गटारी प्रवाहीत कराव्यात आणि कचरा उठाव वेळेत करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# जयसिंगपूरच्या मुख्य रस्त्यावर गटारीचे पाणी

## प्रदुषण नियंत्रण मंडळाने लक्ष घालावे; जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतंत्र प्रशासक नेमावा

जयसिंगपूर/महान कार्य वृत्तसेवा : जयसिंगपूर येथील गल्ली नं. १० येथील मुख्य रस्ता क्रांती चौकापासून काही अंतरावरचा प्रवासाला गुरुवारी नकोनकोसा वाटत होता. रस्त्यावर गटारीचे सांडपाणी दुर्गंधी पसरवणारे रस्त्यावर खचाखच भरले होते.

जयसिंगपुरात नागरी प्रश्नांकडे दुर्लक्ष होत चालले आहे. कोल्हापूर जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी नागरी प्रश्न सुटावेत यासाठी एक स्वतंत्र प्रशासक नियुक्त करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दलची नाराजी या शहरात वाढत चालली आहे. मुख्य रस्त्यावरच सांडपाणी येत असेल तर उपनगरातील अवस्था काय असेल? अशा तिखट प्रतिक्रिया शहराच्या वेगवेगळ्या भागात आहेत.

# महिलांनी संघटीत रहावे

कोल्हापूर/महान कार्य वृत्तसेवा : अवनी संस्थेच्यावतीने बचतगट बांधणी, कचरावेचक महिलांचे संघटन, त्यांचा हक्क आणि लढा याविषयी संघटीत रहावे, असे आवाहन दोन दिवसांच्या प्रशिक्षण शाळेत करण्यात आले. यावेळी अनुराधा भोसले, सुंदरराव देसाई, अभिजीत जाधव, संगीता लाखे यांनी मार्गदर्शन केले.

# चरण येथील शेतकऱ्यांना सव्वा लाख खर्च करुन ग्रा.पं. देणार शेतीचे प्रशिक्षण

शाहूवाडी/महान कार्य वृत्तसेवा : चरण (ता. शाहूवाडी) येथील ग्रामपंचायतीने शेतकऱ्यांसाठी नाविन्यपूर्ण शेती प्रशिक्षण देण्यासाठी १ लाख २८ हजार १९४ रु. खर्च करुन प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे आणि यासाठी कंत्राटदार नेमण्याची मोहिम सुरु केली आहे. याशिवाय ग्रा.पं.ने महिलांना नॅपकिन १ लाख रु. खर्च करुन देणार आहे.

जिल्ह्यातील कंत्राटदारांनी थेट ग्रामपंचायतीला लेखी लखोटा देऊन शेतकरी प्रशिक्षण देण्याची संधी जर उचलली तर कंत्राटदाराचेही नाव मोठे होणार आहे. शिवाय गावातील शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा होणार आहे. प्रशिक्षण देण्यासाठी फार मोठी रक्कम ग्रामपंचायत खर्च करत असल्याने लोकांतून कौतुक होत आहे.

# भाजपातील एक गट राष्ट्रवादीकडे?

कवठेमहांकाळ/महान कार्य वृत्तसेवा: भारतीय जनता पार्टीतील एक गट राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याची शक्यता गुरुवारी व्यक्त केली जात होती. भाजपातील काही नेत्यांच्यात अस्वस्थता निर्माण झाली आहे. मोठे नेते लक्ष्य देत नाहीत अशा तक्रारी शहरात वाढल्या आहेत.

# शिरढोण लक्ष्मी विकास सोसा. निवडणूक गाजण्याची शक्यता

शिरढोण/महान कार्य वृत्तसेवा: शिरढोण येथील श्री लक्ष्मी विकास सेवा सोसायटीच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक यंदा गाजण्याची शक्यता आहे. निवडणुकीसाठी प्रारुप मतदार यादी १९ जानेवारीला प्रसिध्द झाली आहे. २८ जानेवारीपर्यंत या सभासद यादीवर आक्षेप घेतले जाणार आहेत. ७ फेब्रुवारीला त्यावर निर्णय होणार आहे आणि त्यानंतर निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होणार आहे.

# मंगराया विकास सोसा. निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष्य

तेरवाड/महान कार्य वृत्तसेवा : तेरवाड (ता. शिरोळ) येथील मंगराया विकास सेवा सोसायटीच्या निवडणुकीसाठीची मतदार यादी तयार करण्याचे काम सुरु झाले आहे. हरकतीनंतर पक्की मतदार यादी प्रसिध्द होणार आहे. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीनंतर होणाऱ्या या सोसायटीच्या निवडणुकीकडे कुरुंदवाडचेही लक्ष्य लागून राहिले आहे. दत्तनगर आणि जयसिंगपुरातून काय सुत्रे हलतात याचीही उत्सुकता आहे.







# धामणी मध्यम प्रकल्पाला मिळणार गती; आम. आबिटकरांचे प्रयत्न

## मंत्री जयंत पाटील यांच्याशी झाला संवाद । सर्फनाला प्रकल्पाचे काम तात्काळ सुरु होणार

भुदरगड/महान कार्य वृत्तसेवा : धामणी मध्यम प्रकल्प (ता. राधानगरी), सर्फनाला (ता. आजरा) हे दोन्ही प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी अंतिम मान्यता मिळावी अशी मागणी आमदार प्रकाश आबिटकर यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री व सांगलीचे पालकमंत्री जयंत पाटील यांच्याशी संवाद साधला आणि मागणीचे निवेदन दिले. यावेळी गोकुळ दूध संघाचे संचालक नंदकुमार ढेंगे व अन्य प्रमुख उपस्थित होते. यावेळी त्यांनी हा प्रकल्प तात्काळ सुरु होणे का आवश्यक याबद्दलची माहिती विषद केली.












